रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड | बुधवार । दि. १६ सप्टेंबर २०२६ । अंक १०१ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in




## आता एनसीएमसीचे 'टॉपअप' एसटीत

**मुंबई :** एसटी महामंडळाने महिला आणि ६५ ते ७५ वयोगटातील ज्येष्ठ नागरिकांसाठी एनसीएमसी कार्डचे वाहकांमार्फतच 'टॉपअप' करण्याची सुविधा सुरू केली आहे. त्यामुळे कार्डमध्ये बॅलन्स नसल्यास रिचार्जसाठी डेपो अथवा केंद्रावर जाण्याची प्रवाशांची धावपळ कमी होणार आहे. एक सप्टेंबरपासून सवलतीच्या प्रवासासाठी एनसीएमसी कार्ड अनिवार्य करण्यात आले होते. मात्र, बॅलन्सअभावी अनेक प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत होता. आता बसमध्येच आवश्यक रक्कम कार्डमध्ये भरता येणार असल्याने सवलतीचा लाभ घेणे सोपे होणार आहे.




### वेधक

## सतरा वर्षीय मुलीवर अत्याचार

**पनवेल :** सतरा वर्षीय मुलीवर अत्याचार करून ती गर्भवती राहिली आणि तिने बाळाला जन्म दिला. याप्रकरणी हाफिज अन्सारी (२०, रा. कांबा गाव, मुरबाड) याच्या विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यातील सतरा वर्षे नऊ महिने वयाच्या पीडितेसोबत इंस्टाग्रामवर अन्सारी याने ओळख केली. तिच्याशी मैत्री केली, तिला लग्नाचे आमिष दाखवले आणि तिच्यावर अत्याचार केला. याबाबत कोणाला सांगितले तर तुला आणि तुझ्या आईला बघून घेईन, अशी धमकी दिली. त्यात ती गर्भवती राहिली आणि तिने एका अपत्याला जन्म दिला. त्यानंतर आरोपी तिला सोडून पळून गेला.

## रसायन भरलेला कंटेनर उलटला



**कोलाड :** मुंबई-गोवा महामार्गावरील पुगाव गावाच्या हद्दीत मंगळवारी (१५ सप्टेंबर) पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास जेएनपीटीहून महाडच्या दिशेने धोकादायक रसायन घेऊन जाणाऱ्या कंटेनरचा अपघात झाला. कंटेनरमधून अत्यंत ज्वलनशील रसायनाची वाहतूक सुरू होती. अपघातानंतर कंटेनरच्या मॅनहोलमधून रसायनाची पान २ वर

## मनोज जरांगेंची मुंबईकडे कूच

**जालना :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील यांनी मंगळवार, दि. १५ सप्टेंबर रोजी अंतरवाली सराटी येथील उपोषणाची जागा सोडून मुंबईच्या दिशेने कूच केले. मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. अंतरवाली सराटी येथून निघताना जरांगे पाटील भावूक झाले. गाडीत बसताच त्यांच्या डोळ्यांत अश्रू आले. यावेळी माध्यमांशी बोलताना जरांगे यांनी मराठा समाजाच्या मागणीवरून सरकारसमोर झुकणार नसल्याचे स्पष्ट केले.

### गणेश विसर्जन मिरवणुकांवर निर्बंध

# डीजेचा आवाज बंद

### आदेश मोडल्यास थेट कारवाई | रायगड जिल्हाधिकाऱ्यांचा इशारा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

गणेश विसर्जन मिरवणुकीतील डीजेच्या दणदणाटावर अखेर प्रशासनाने कायद्याचा हातोडा मारला आहे. राज्यभरात गणेशोत्सवातील डीजेच्या आवाजावरून रणकंदन सुरू असतानाच रायगड जिल्हा प्रशासनानेही कडक भूमिका घेतली आहे. नागरिकांचे आरोग्य, डोळ्यांची सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्था लक्षात घेऊन दि. १९ आणि २५ सप्टेंबरच्या विसर्जन मिरवणुकांमध्ये डॉल्बी/डीजे साऊंड सिस्टीम, तीव्र क्षमतेचे लेझर बीम, स्नो स्प्रे आणि केमिकल स्प्रेच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी प्रतिबंधकात्मक अधिसूचना जारी केली आहे. आदेशाचे उल्लंघन केल्यास थेट कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

गणेश विसर्जनाच्या मिरवणुका शांततेत पार पडाव्यात, कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ नये, हा या निर्णयामागील उद्देश आहे. गणेशोत्सवात डॉल्बी आणि डीजेच्या कर्णकर्कश आवाजामुळे नागरिकांना त्रास होण्याबरोबरच आरोग्यावरही परिणाम पान २ वर



**दोन दिवस महत्त्वाचे**

दि. १९ सप्टेंबर रोजी गौरी-गणपती विसर्जन आणि दि. २५ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशी या दोन्ही दिवशी होणाऱ्या श्री गणेश विसर्जन मिरवणुकांसाठी डीजे, डॉल्बी, तीव्र लेझर बीम, स्नो स्प्रे आणि केमिकल स्प्रेवरील प्रतिबंध लागू राहणार आहे.

> "गणेशोत्सव उत्साहात आणि शांततेत पार पडणे आवश्यक आहे. नागरिकांचे आरोग्य तसेच मिरवणुकीतील अधिकारी व कर्मचाऱ्यांची सुरक्षितता लक्षात घेऊन हा प्रतिबंधात्मक निर्णय घेण्यात आला आहे. सर्व गणेश मंडळांनी प्रशासनाच्या आदेशाचे पालन करून सहकार्य करावे."
>
> **– किशन जावळे,** जिल्हाधिकारी


# दीड दिवसांच्या बाप्पाला निरोप

### रायगडात २६ हजार १८२ गणेशमूर्तींचे विसर्जन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

दीड दिवस घराघरांत भक्तीचा, आनंदाचा आणि उत्साहाचा माहोल निर्माण करणाऱ्या गणरायाला मंगळवारी (दि. १५) सायंकाळी गणरायाला जड अंतःकरणाने निरोप देण्यात आला. डोळ्यांत पाणी, मनात हुरहूर आणि ओठांवर 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'चा जयघोष करीत गणेशभक्तांनी आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप दिला. रायगड जिल्ह्यात २६ हजार १८२ गणेशमूर्तींचे तलाव, नदी, समुद्र व खाडीमध्ये विसर्जन करण्यात आले. भक्तिमय आणि भावनिक वातावरणात हा निरोप सोहळा पार पडला.

रायगड जिल्ह्यात घरोघरी वाजतगाजत गणरायाचे आगमन झाले. पारंपरिक खालू बाजा, बेंजो तसेच 'गणपती बाप्पा मोरया'चा गजर करीत गणेशभक्तांनी बाप्पाचे स्वागत केले. गणरायाच्या स्वागताला पावसानेही हजेरी लावली. जिल्ह्यात मनोभावे पूजा-अर्चा करीत पान २ वर



**नगरपरिषदेच्या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद**

दीड दिवसांच्या गणरायाला अखेरचा निरोप देण्यासाठी समुद्रकिनारी दाखल होणाऱ्या भक्तांच्या सुरक्षेसाठी अलिबाग नगरपरिषदेने विशेष मेहनत घेतली. गणेशमूर्ती विसर्जनासाठी नगरपरिषदेच्या वतीने समुद्रकिनारी कृत्रिम तलावाची निर्मिती करण्यात आली. या कृत्रिम तलावात शंभरहून अधिक गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. पर्यावरणाचा समतोल राखण्याबरोबरच समुद्रकिनाऱ्यावरील स्वच्छता कायम ठेवण्यासाठी कृत्रिम तलावात मूर्तींचे विसर्जन करण्याचे आवाहन करण्यात आले. या आवाहनाला गणेशभक्तांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भाविकांनी तलावातच मूर्ती विसर्जन करण्याला पसंती दर्शविली. समुद्रकिनारी पोलिसांचे मदत कक्ष, नगरपरिषदेचे स्वागत कक्ष आणि आरती स्थळ उभारण्यात आले. गर्दी टाळणे आणि स्वच्छता राखण्यासाठी निर्माल्य संकलन कलश ठेवण्यात आले होते. भाविकांनी फुले व इतर निर्माल्य कलशात टाकण्यावर भर दिला.

# पोलीस कर्मचाऱ्याकडून महिलेची छेड

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

ज्यांच्याकडून महिलांच्या सुरक्षेची अपेक्षा केली जाते, त्यांच्याच दलातील कर्मचाऱ्यावर महिलेची छेडछाड केल्याचा गंभीर आरोप झाल्याने कर्जत तालुक्यात खळबळ उडाली आहे. कर्जत शहरातून गुंडगे येथे घरी परतणाऱ्या महिलेला दोन मद्यधुंद इसमांनी अडवत छेडछाड केल्याचा प्रकार १३ सप्टेंबर रोजी रात्री घडला. धक्कादायक म्हणजे, यातील एक आरोपी पोलीस कर्मचारी असल्याचे समोर आले.

- **गुंडगेतील संतापजनक प्रकार**
- **तब्बल पाच तासांनी मध्यरात्री गुन्हा दाखल**

घटनेचा व्हिडिओही महिलेच्या बहिणीने मोबाईलमध्ये कैद केला. मात्र, तक्रार दाखल करण्यासाठी पीडित महिला व नातेवाईक पोलीस ठाण्यात पोहोचल्यानंतरही गुन्हा नोंदविण्यास विलंब झाल्याने पोलिसांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पान २ वर



# धगडवाडीत महिलेवर जीवघेणा हल्ला

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील धगडवाडी येथे घराच्या मागील वरांड्यात भांडी घासत असलेल्या महिलेवर अज्ञात इसमाने अचानक हल्ला केल्याची धक्कादायक घटना १२ सप्टेंबर रोजी सकाळी साडेआठच्या सुमारास घडली. दबा धरून आलेल्या हल्लेखोराने महिलेच्या कानावर काठीने जोरदार प्रहार केल्यानंतर धारदार हत्याराने हातावर व बोटांवर वार केले. महिलेच्या आरडाओरडानंतर हल्लेखोर जंगलाच्या दिशेने पसार झाला. भरदिवसा घराच्या मागे झालेल्या या जीवघेण्या हल्ल्याने धगडवाडी परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

**काठीसह धारदार हत्याराने वार, परिसरात खळबळ**

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित महिला सकाळी घराच्या मागील वरांड्यात भांडी घासत होत्या. परिसरात सामसूम असल्याची संधी साधून अज्ञात इसम मागील बाजूने वरांड्यात आला आणि महिलेच्या पाठीमागून त्यांच्या उजव्या कानाच्या भागावर काठीने हल्ला केला. त्यानंतर धारदार हत्याराने डाव्या हाताच्या दंडाच्या मागील बाजूस तसेच बोटांवर वार करून त्यांना गंभीर जखमी केले. महिलेचा आरडाओरडा ऐकून मदतीसाठी कोणी येत असल्याचे लक्षात येताच हल्लेखोर जंगलाच्या दिशेने पसार झाला. जखमी महिलेला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.

हल्लेखोराचा उद्देश चोरीचा होता की अन्य काही कारणातून हा हल्ला करण्यात आला, याबाबत अद्याप स्पष्टता झालेली नाही. महिलेच्या तक्रारीवरून कोलाड पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सपोनि भारत फार्णे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महाडिक तपास करीत असून, हल्लेखोराचा शोध सुरू आहे.

# बुरशी लागलेली रसमलाई विक्रीला

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिक मोठ्या प्रमाणात मिठाई आणि खाद्यपदार्थांची खरेदी करत असताना कामोठे सेक्टर-२५ येथील बिकानेरच्या दुकानात बुरशी लागलेली रसमलाई विकल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ग्राहकांच्या ताटात खराब खाद्यपदार्थ पोहोचत असतील, तर हा केवळ दुकानदाराचा निष्काळजीपणा नसून, सामान्य नागरिकांच्या आरोग्याशी थेट खेळ असल्याने संताप व्यक्त होत आहे.



अक्षय देवकर यांनी संबंधित दुकानातून रसमलाई खरेदी केली होती. मात्र, घरी आणल्यानंतर रसमलाई खराब झाल्याचे आणि त्यावर चक्क बुरशी लागल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तात्काळ दुकान मालकाला याची माहिती दिली. त्यानंतर दुकानमालकाने रसमलाई खराब असल्याचे मान्य करत अक्षय देवकर यांची माफी मागितली.

या प्रकाराची माहिती समोर येताच उपस्थित नागरिकांनीही संताप व्यक्त केला. गणेशोत्सवासारख्या सणाच्या काळात मोठ्या प्रमाणात मिठाईची विक्री होत असताना खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेकडे दुर्लक्ष होत असेल, तर नागरिकांच्या आरोग्याची जबाबदारी कोणाची? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

- **कामोठ्यात मिठाई दुकानदाराचा संतापजनक प्रकार**
- **ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ**

दरम्यान, अन्नसुरक्षा विभागाने या प्रकाराची तातडीने दखल घेऊन संबंधित दुकानाची अचानक तपासणी करावी, रसमलाईसह अन्य खाद्यपदार्थांचे नमुने तपासणीसाठी घ्यावेत आणि नियमांचे उल्लंघन आढळल्यास कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

### प्रशासनाच्या सोबतीने काम | तीन वर्षांत अकराशे जणांचा जीव वाचविण्यासाठी बाजी

# आपदा मित्र ठरले देवदूत!

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

पुराच्या लोंढ्यात अडकलेले जीव, डोंगरकड्यांवरून कोसळणाऱ्या दरडी आणि डोक्यावर घोंघावणारे संकट... अशा आपत्कालीन प्रसंगात स्वतःच्या जीवाची पर्वा न करता मदतीसाठी धावून जाणारे रायगडचे आपदा मित्र अनेकांसाठी अक्षरशः देवदूत ठरले आहेत. गेल्या तीन वर्षांत पूर, दरड आणि अतिवृष्टीच्या संकटात तब्बल अकराशे जणांना वाचविण्यासाठी या आपदा मित्रांनी जीवाची बाजी लावली आहे.

निसर्ग चक्रीवादळ, तौक्ते वादळ आणि त्यानंतर महाड-पोलादपूरमध्ये २०२१ मध्येझालेल्या दरडीच्या घटनांनी रायगडमध्ये मोठी हानी केली. वादळामुळे वीजतारा, वीजखांब आणि रोहित्रे उखडून पडली. अलिबाग, मुरूड आणि श्रीवर्धनसह अनेक भागांना मोठा फटका बसला. किनारपट्टीवरील सुपारीच्या बागांचे मोठे नुकसान झाले, तर आंबा-काजूच्या बागाही उद्ध्वस्त झाल्या. एक लाखांहून अधिक नागरिकांना वादळाचा थेट फटका बसला



असून, हजारो घरांची छपरे व पत्रे उडून गेली होती. या आपत्तींच्या पार्श्वभूमीवर स्थानिकांच्या मदतीने आपत्कालीन परिस्थितीवर मात करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने तीन वर्षांपूर्वी आपदा मित्रांची निवड केली. प्रशासनाच्या खांद्याला खांदा लावून काम करण्यासाठी १८ ते ४० वर्षे वयोगटातील स्थानिकांना या उपक्रमात सहभागी करून घेण्यात आले. जिल्ह्यात ३०० आपदा मित्रांची निवड करून महाड, माणगाव, पनवेल आणि पेण येथे त्यांना प्रशिक्षण देण्यात आले. यात तरुणांसह महिलांचाही सहभाग आहे. अतिवृष्टी, पूर किंवा दरडीच्या प्रसंगी गरजूंना मदत करण्याबरोबरच आपद्ग्रस्तांना सुरक्षित ठिकाणी हलविण्याची जबाबदारी आपदा मित्र पार पाडत आहेत. गेल्या तीन वर्षांत जून-जुलैमध्ये झालेल्या अतिवृष्टीदरम्यान अनेक भागांत पूर आणि दरडी कोसळल्या. अशा वेळी आपदा मित्रांनी धोकादायक परिस्थितीत धाव घेत अनेकांना सुरक्षित बाहेर काढले.

आपत्ती व्यवस्थापन कार्यालयाच्या माहितीनुसार, आतापर्यंत सुमारे एक हजार शंभर जणांना वाचविण्यासाठी आपदा मित्रांनी प्रयत्न केले आहेत. स्वतःच्या जीवाची पर्वा न करता संकटात सापडलेल्यांना आधार देणाऱ्या या तरुणांमुळे रायगडमध्ये आपदा मित्रांचा उपक्रम खऱ्या अर्थाने जीवनदायी ठरला आहे.

## सातवा स्मृतिदिन



**कै.सौ. सरीता गिरीधर पिंगळे**

**स्वर्गवास : १६-०९-२०१९**

दिनरात तूच कष्टकरी, जणू दिव्यात वात तेवणारी
कंपने जगाची तुला न कळली, लहान लेकरांना ज्ञानामृत पाजीली
आप्त अन सारे तू मिळविले, स्वतःच्या हाताने तूच भरविले
जिवनी तुझ्या नव्हतीस गाय, तरीही आहेस दुधावरची साय

**तुझी आठवण काढणारे**

श्री. गिरीधर काशिनाथ पिंगळे (पती),
श्री. सुजितकुमार गिरीधर पिंगळे, सौ. सायली सुजितकुमार पिंगळे,
श्री. अजितकुमार गिरीधर पिंगळे, सौ. अस्मिता अजितकुमार पिंगळे,
नातवंडे : कु. स्वप्नाली, कु. समृद्धी, शुभम, रोहन, रोहित

गोरठण बु. (वावोशीफाटा) ता. खालापूर, जि.रायगड

# महाजने-दिवीवाडी रस्ता खड्ड्यात

## ●जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे दुर्लक्ष ●ऐन गणेशोत्सवात खड्ड्यातून प्रवास करण्याची वेळ

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

ग्रामीण भागातील सर्व घटकांचा विकास साधण्याचा दावा जिल्हा परिषदेकडून कायमच केला जातो. प्रत्यक्षात मात्र हा दावा फेल ठरत असल्याचे दिसून आले आहे. अलिबाग तालुक्यातील महाजने-दिवीवाडी हा एक किलोमीटरचा रस्ता खड्ड्यात गेला आहे. ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या दुर्लक्षपणामुळे ऐन गणेशोत्सवात प्रवास खड्ड्यातून होत आहे. त्यामुळे बांधकाम विभागाच्या कारभाराबाबत तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.



रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागांचा विकास साधण्यासाठी जिल्हा परिषद ही स्वतंत्र संस्था आहे. या संस्थेच्या माध्यमातून वेगवेगळ्या वैयक्तीक व सार्वजनिक योजना राबविल्या जातात. जिल्ह्यात दोन हजारपेक्षा गावे, वाड्यांचा समावेश आहे. या वाड्या व गावांचा विकास साधण्यासाठी जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडून रस्ता दुरुस्ती व नूतनीकरणाची कामे केली जातात. अलिबाग तालुक्यातील महाजनेमधील दिवीवाडीमध्ये मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज आहे. या वाडीकडे जाणारा रस्ता गेल्या चार वर्षांपासून खराब झाला आहे. त्याची दुरुस्ती करण्यास जिल्हा परिषद बांधकाम विभाग उदासीन ठरले आहेत. या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. त्यामुळे रस्त्याला तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. या रस्त्यावरून वाहन चालविताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. खड्डे चुकविताना अपघात होण्याची भीती निर्माण झाली आहे.

गणेशोत्सवापूर्वी खड्डे दुरुस्त करण्याचे आदेश जिल्हा परिषद प्रशासनाने बांधकाम विभागाला दिले होते. मात्र, बांधकाम विभागाने या आदेशाकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे ऐन गणेशोत्सवात खड्ड्यातून प्रवास करण्याची वेळ प्रवाशांसह भक्तांवर आली आहे. बांधकाम विभागाच्या दुर्लक्षपणामुळे हा रस्ता गायब झाला आहे. जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या कारभाराबाबत तीव्र संताप निर्माण झाला आहे.

> **महाजने ते दिवीवाडी रस्ता पूर्णतः खराब झाला आहे. अनेक ठिकाणी खड्डे पडले आहेत. त्यामुळे रस्ता गायबच झाल्याचे चित्र आहे. गेल्या चार वर्षांपासून या रस्त्याची दुरुस्तीच केली नाही. त्यामुळे खड्ड्यांतून प्रवास करण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. हा रस्ता तातडीने दुरुस्त करण्यात यावा, अशी मागणी होत आहे.**
>
> **रघुनाथ नाईक**
> **- सामाजिक कार्यकर्ते**

## तीन वर्षांनंतर प्रशासनाला जाग




### ■ माथेरान नगरपरिषदेत रजिस्टरची 'हालचाल'

। कर्जत । प्रतिनिधी ।

गेल्या तीन वर्षांपासून बेपत्ता असलेले माथेरान नगरपरिषदेचे हालचाल रजिस्टर अखेर सापडले की नवीन बनवले? माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी लावून धरलेल्या पाठपुराव्यामुळे आणि वरिष्ठ कार्यालयाकडे झालेल्या तक्रारींनंतर माथेरान नगरपरिषद प्रशासनाने अखेर आपल्या अधिकाऱ्यांचे हालचाल रजिस्टर ठेवण्यास सुरुवात केल्याची माहिती कार्यालयीन अधीक्षक सदानंद इंगळे यांनी दिली.

गेल्या तीन वर्षांपासून बैठका दाखवून बिल कोणत्या आधारावर काढली याचे उत्तर मात्र मिळणे अपेक्षित आहे. पण अलीबाग येथील सहाय्यक आयुक्त पल्लवी भागवत यांनी माथेरान नगरपरिषदेला सूचना करून हालचाल रजिस्टर ठेवण्यास सांगितले. पण, अगोदर काढलेल्या बिलाची चौकशी होणे तिचकेत गरजेचे आहे.

हालचाल रजिस्टर ठेवल्यावर मुख्याधिकारी कधी येतात कधी जातात याची नोंद आता अधीक्षक सदानंद इंगळे कशा प्रकारे ठेवतात हे ही तितकेच महत्त्वाचे आहे ते आता स्पष्ट होणार आहे. याप्रकरणी माहिती अधिकारात विचारणा केली असता नगरपरिषदेकडून "रजिस्टर उपलब्ध नाही" अशी उत्तरे देण्यात येत होती. यातच अधिकारी कार्यालयात न येता घरी बसूनच/बिले आणि बैठक भत्ते उचलत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते दिंगबर चंदने यांनी केला होता.

# लोक अदालतीमधून दहा हजार प्रकरणांचा निपटारा

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यांमधील न्यायालयांमध्ये शनिवारी (दि. १२) राष्ट्रीय लोक अदालत हा उपक्रम राबविण्यात आला. या माध्यमातून दहा हजारहून अधिक प्रकरणांचा जागेवर निपटारा करण्यात आला आहे. ५८ कोटी आठ लाख ७२ हजार ३९८ इतक्या रकमेची तडजोड झाली आहे. राष्ट्रीय लोक अदालतीला नागरिकांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. न्यायालयात प्रलंबित तसेच दाखलपूर्व वादांचा जलद, सुलभ आणि सामंजस्यपूर्ण निपटारा व्हावा, पक्षकारांचा वेळ व खर्च वाचावा आणि परस्पर संवादातून वादांना कायमस्वरूपी पूर्णविराम मिळावा, या उद्देशाने लोक अदालत घेण्यात आले होते.

मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा रायगड जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती मिलिंद साठ्ये, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा रायगड जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती अद्वैत सेठना, रायगड-अलिबागचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष एस.बी. अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली या राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते.

राष्ट्रीयलोकअदालतीचेउद्घाटन न्यायमूर्ती मिलिंद साठ्ये यांच्या हस्ते दृकश्राव्य माध्यमातून झाले. यावेळी अलिबाग येथील न्यायिक अधिकारी, जिल्हा सरकारी वकील संतोष पवार, वकील संघटनेचे अध्यक्ष प्रसाद पाटील, उपाध्यक्ष अनंत पाटील यांच्यासह अधिवक्ते उपस्थित होते. रायगड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील न्यायिक अधिकारी, न्यायालयीन कर्मचारी, तालुका वकील संघटनांचे पदाधिकारी व अधिवक्तेही दृकश्राव्य माध्यमातून सहभागी झाले.

### ■ ५८ कोटी ८ लाखांहून अधिक रकमेची तडजोड

जिल्ह्यात राष्ट्रीय लोक अदालतीसाठी २८ लोक अदालत कक्ष स्थापन करण्यात आले होते. यामध्ये जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या स्तरावर सहा, तालुका स्तरावर २२ कक्ष कार्यरत होते. लोक अदालतीसमोर ३५ हजार ६५४ दाखलपूर्व आणि १४ हजार ८३६ न्यायालयीन प्रलंबित, अशी एकूण ५० हजार ४९० प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी पाच हजार ४६४ दाखलपूर्व आणि पाच हजार २३९ प्रलंबित, अशी एकूण १० हजार ७०३ प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात आली. दाखलपूर्व प्रकरणांमध्ये तीन कोटी ७८ लाख ९२ हजार ७६२ रुपये आणि प्रलंबित प्रकरणांमध्ये ५४ कोटी २९ लाख ७९ हजार ६३६ अशी एकूण ५८ कोटी आठ लाख ७२ हजार ३९८ इतक्या विक्रमी रकमेची तडजोड करण्यात आली.

### व्हिडिओ कॉलद्वारेही प्रकरणांचा निपटारा

आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत आवश्यक त्या प्रकरणांमध्ये पक्षकारांना प्रत्यक्ष न्यायालयात उपस्थित राहण्याची सक्ती न करता व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून संवाद व आवश्यक पडताळणी करून प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात आली. त्यामुळे दूरवर असलेल्या किंवा अपरिहार्य कारणांमुळे प्रत्यक्ष उपस्थित राहू न शकणाऱ्या पक्षकारांनाही लोक अदालतीच्या माध्यमातून वाद मिटविण्याची संधी मिळाली.

### चार दाम्पत्यांचा संसार पुन्हा जुळला

लोक अदालतीच्या यशाला मानवी संवेदनांचीही जोड मिळाली. रोहा येथील एक, महाड येथील दोन आणि खालापूर येथील एक, अशा चार दाम्पत्यांमधील वैवाहिक वाद सामंजस्याने मिटले. त्यांचे संसार पुन्हा जुळले. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.बी. अग्रवाल यांनी या दाम्पत्यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी वैवाहिक जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.

## रस्त्याची दुर्दशा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

तालुक्यातील कुरुळ ते बेलकडे रस्त्याची अक्षरशः दुर्दशा झाली असून, वाहने चालविणे धोक्याचे झाले आहे. रस्त्यावरील खडी पूर्णतः बाहेर आल्याने मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. संबंधित विभागाने याकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे.

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
**(महाराष्ट्र शासन अंगिकृत)**
**जाहिर नोटीस**

सर्व संबंधित नागरिकांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मऔविम महाड औद्योगिक क्षेत्रामधील खालील भूखंड हे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या मालकीच्या क्षेत्रात असून सदर भूखंडातील लहान मोठी वृक्ष स्थलांतरित करणेसाठी व वृक्ष संवर्धनासाठी वृक्ष अधिकारी म्हणून माझेकडे परवानगी मागितली आहे. सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | नाव व भूखंड क्र. | एकूण वृक्ष संख्या | वृक्ष स्थलांतरित करणेसाठी परवानगी मागितलेली संख्या | करण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| १. | मे. ग्रासिम इंडस्ट्रीज लिमिटेड महाड औद्योगिक क्षेत्र भूखंड क्र.आरएल-३,४,१५,१६,१६/१, ३/१ | ७२ नंबर | अ) वृक्ष स्थलांतरित करणेसाठी त्यांची तपशिलवार माहिती पुढीलप्रमाणे आहे.<br>१) बाभूळ = ८<br>२) अशोक = ६<br>३) बदाम = ३<br>४) बहावा = ५<br>५) बकुळ = १<br>६) चाफा = १<br>७) चारकोल ट्री = ३<br>८) पेरू = ४<br>९) गुलमोहर = २<br>१०) फणस = ६<br>११) जांभूळ = ६<br>१२) कदंब = ३<br>१३) काशीद = १<br>१४) आंबा = ८<br>१५) निलगिरी = १<br>१६) पारिजातक = १<br>१७) पिंपळ = १<br>१८) पेल्टोफोरम = १<br>१९) रेन ट्री/वर्षावृक्ष = ७<br>२०) साग = १<br>२१) उंबर = ३ | |
| | | | एकुण ७२ | |

तरी Maharashtra (Urban Areas) Protection And Preservation of Trees Act १९७५ कलम ८ (३) (a) नुसार सदर वृक्ष स्थलांतरित करणेसाठी कसल्याही प्रकारची हरकत असल्यास तसे त्यांनी आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसाच्या आत नमुद केलेल्या पत्त्यावर लेखी कळवावे, तसे कोणी न कळविल्यास मागणीप्रमाणे वृक्ष स्थलांतरित करणेसाठी व वृक्ष संवर्धन करण्यासाठी परवानगी दिली जाईल. नंतर कोणाची व कसलीही तक्रार ग्राह्य घेण्यात येणार नाही, म्हणून महाड पाणी पुरवठा विभागातर्फे जाहिर नोटीस दिली आहे.

**सही/-**
**वृक्ष अधिकारी**
**कार्यकारी अभियंता तथा विनिप्रा**
**स्थापत्य विभाग, महाड**

# सर्कलला बॅनरचा विळखा कशासाठी?

## चारफाट्यावर वाहनचालकांचा जीव मुठीत

। उरण । प्रतिनिधी ।

उरण शहरातील वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या उरण चारफाटा येथे वाहतूक सुरळीत व्हावी आणि अपघातांना आळा बसावा यासाठी सिग्नल यंत्रणा बसविण्यात आली असतानाच, याच चारफाट्यावरील सर्कलला मोठमोठ्या बॅनरचा विळखा पडल्याचे धक्कादायक चित्र पाहावयास मिळत आहे.

सिग्नल बसवून वाहतूक सुरक्षित करण्याचा प्रयत्न एकीकडे आणि दुसरीकडे वाहन चालकांना समोरचे वाहनच दिसू नये, अशी बॅनरबाजी दुसरीकडे; मग हा कसला वाहतूक नियोजनाचा खेळ, असा संतप्त सवाल नागरिकांकडून केला जात आहे. सर्कलच्या परिसरात लावण्यात आलेल्या मोठमोठ्या बॅनरमुळे वाहनचालकांची दृश्यता कमी होत असून, वळण घेताना समोरून येणारे वाहन वेळेत दिसत नसल्याने अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. विशेषतः दुचाकीस्वार आणि चारचाकी वाहनचालकांना अचानक समोर वाहन आल्यास परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता आहे.

सिग्नल बसविण्यावर प्रशासनाने खर्च केला, वाहतूक नियंत्रणाची यंत्रणा उभी केली; मात्र त्याच व्यवस्थेला बॅनरच्या विळख्यात अडकवून ठेवायचे असेल तर या सगळ्या नियोजनाचा उपयोग काय, असा सवालही आता उपस्थित होत आहे.

नागरिकांच्या जीवापेक्षा जाहिरात मोठी होऊ देऊ नका. उरण चारफाटा आणि शहरातील सर्व सर्कल तातडीने बॅनरमुक्त करा; अपघात होण्यापूर्वी प्रशासनाने जागे व्हावे, एवढीच उरणकरांची अपेक्षा आहे.

पान १ वरुन

## दीड दिवसांच्या बाप्पाला निरोप

एक लाख पाच हजार गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली. दुपारपर्यंत प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर पूजा, आरती घेण्यात आली. बाप्पाला आवडणारे मोदक घरोघरी करण्यात आले. भजनांसह गाण्यांचे कार्यक्रम दिवसभर घेण्यात आले. लहान मुलांसह ज्येष्ठ मंडळीही या उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी झाली होती.

फुलांसह रोषणाईने गणेशमूर्तीची आरास सजवत बाप्पाचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. दीड दिवस सेवा केल्यानंतर मंगळवारी दुपारपासून विसर्जनाची तयारी सुरू झाली. पूजा, आरती झाल्यानंतर डोक्यावर तसेच चारचाकी वाहनातून मूर्ती घेऊन बेंजोच्या वाद्यांसह भजन करीत गावागावांतून, वाड्यावस्त्यांतून मिरवणुका काढण्यात आल्या. विसर्जनस्थळी पोहोचल्यानंतर सामूहिक आरती घेण्यात आली. नदी व तलावांमध्ये गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी गावांतील तरुणांनी स्वयंसेवक म्हणून भूमिका बजावली.

अलिबागसह काशीद, वरसोली, मुरूड, रेवदंडा, नागाव, थेरोंडो, किहाम नागाव, श्रीवर्धन अशा अनेक समुद्रकिनाऱ्यांवर २६ हजार १८२ गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. त्यात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या १३ आणि घरगुती २५ हजार १६९ गणेशमूर्तींचा समावेश होता. जड अंतःकरणाने बाप्पाला निरोप देताना 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'चा जयघोष करण्यात आला.

अलिबाग नगरपरिषदेतर्फे दीड दिवसांच्या पर्यावरणपूरक गणेश मूर्तींच्या विसर्जनासाठी कृत्रिम तलावाची सोय करण्यात आली आहे. या उपक्रमात सहभाग घेऊन गणेशमूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावात करणाऱ्या भाविकांना सहभाग प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. गेल्या वर्षी दीड दिवस, पाच दिवस आणि अनंत चतुर्दशी मिळून २०० हून अधिक गणेशमूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावामध्ये झाले होते. यावेळी हा आकडा नागरिकांच्या पर्यावरणप्रती जागरूकतेमधून वाढण्याचा विश्वास आहे. यावर्षी राबविण्यात आलेल्या कृत्रिम तलाव उपक्रमात सहभाग घेऊन पर्यावरणाच्या संरक्षणास सहकार्य करावे, असे आवाहन अलिबाग नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सागर साळुंखे केले आहे.

## डीजेचा आवाज बंद!

होण्याची शक्यता असते. त्याचप्रमाणे मिरवणुकांमध्ये वापरण्यात येणाऱ्या तीव्र क्षमतेच्या लेझर बीममुळे डोळ्यांना इजा होण्याचा धोका आहे. विशेषतः विसर्जन मिरवणुकीच्या बंदोबस्तासाठी तैनात असलेल्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या डोळ्यांच्या सुरक्षेचाही प्रशासनाने गांभीर्याने विचार केला आहे.

गणेश विसर्जन मिरवणुकीत डीजे वाजवायचा की नाही, यावरून राज्यातील विविध भागांत चर्चा आणि वाद सुरू असतानाच रायगड प्रशासनाच्या निर्णयाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. गणेशोत्सवाचा उत्साह कायम ठेवतानाच नागरिकांच्या आरोग्याची किंमत मोजून जल्लोष नको, अशी भूमिका प्रशासनाने घेतली आहे. त्यामुळे पारंपरिक वाद्ये, भजन आणि भक्तिमय वातावरणात विसर्जन मिरवणुका पार पाडण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

**आदेश मोडला तर कारवाई**

डॉल्बी/डीजे साऊंड सिस्टीम, तीव्र क्षमतेचे लेझर बीम लाईट, स्नो स्प्रे किंवा केमिकल स्प्रेचा वापर करून प्रतिबंधात्मक आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्ती, संस्था, गणेश मंडळ अथवा संचालकांवर भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३ अन्वये दंडनीय कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर पोलिसांची करडी नजर राहणार आहे.

## पोलीस कर्मचाऱ्याकडून महिलेची छेड

मिळालेल्या माहितीनुसार, रात्री साडेनऊच्या सुमारास महिला आपल्या बहिणीसोबत कर्जत बाजारातून गुंडगे येथील घरी जात होत्या. जकात नाक्याजवळील रेल्वे पुलावरून जात असताना मागून आलेल्या दोन मद्यधुंद इसमांनी त्यांचा पाठलाग केला. त्यातील एकाने महिलेला "चल येते का, चल" असे म्हणत छेड काढल्याचा आरोप आहे. महिलेच्या पतीने घटनास्थळी धाव घेत आरोपींना जाब विचारला असता, छेडछाड करणारा इसम पोलीस कर्मचारी प्रमोद मारोती पाटील (भिसेगाव) असल्याचे समोर आले. त्याच्यासोबत महेंद्र भगवान भंडारे (गुंडगे) हा इसम असल्याचेही तक्रारीत नमूद आहे.

या प्रकाराचा व्हिडिओ महिलेच्या बहिणीने मोबाईलमध्ये रेकॉर्ड केला. तो व्हिडिओ डिलीट करण्यासाठी पोलीस कर्मचाऱ्याकडून दबाव आणण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

घटनेनंतर पीडित महिला आणि तिचे नातेवाईक तक्रार देण्यासाठी कर्जत पोलीस ठाण्यात गेले. मात्र, आरोपी पोलीस दलातील असल्याने सुरुवातीला गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ होत असल्याचा आरोप करण्यात आला. अखेर घटनेची माहिती मिळताच सुमारे २० ते ३० ग्रामस्थ पोलीस ठाण्यात जमा झाले आणि कारवाईची मागणी करीत ठिय्या दिला. ग्रामस्थांच्या आक्रमक भूमिकेनंतर मध्यरात्री २.३४ वाजता प्रमोद मारोती पाटील आणि महेंद्र भगवान भंडारे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

महिलेच्या सुरक्षेची जबाबदारी असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यावरच छेडछाडीचा आरोप होणे आणि त्यानंतर गुन्हा दाखल करण्यास झालेला विलंब यामुळे 'रक्षकच भक्षक झाले तर न्याय मागायचा कुणाकडे?' असा संतप्त सवाल कर्जत परिसरातून उपस्थित होत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास कर्जत पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक उमेश पाटील करीत आहेत.

## रसायन भरलेला कंटेनर उलटला

गळती सुरू झाल्याने मोठ्या दुर्घटनेचा धोका निर्माण झाला होता. घटनेची माहिती मिळताच एसव्हीआरएसएस टीम, येरुणकर क्रेन सर्व्हिस, महामार्ग पोलीस आणि कोलाड पोलिसांसह संबंधित यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. पथकांनी खबरदारी घेत गळती नियंत्रणात आणण्यासाठी तातडीने उपाययोजना सुरू केल्या. रसायन ज्वलनशील असल्याने ठिणगी अथवा आगीचा कोणताही स्रोत निर्माण होऊ नये, यासाठी विशेष दक्षता घेण्यात आली.

सुरक्षेच्या दृष्टीने घटनास्थळी 'नो मोबाईल झोन' लागू करण्यात आला. तसेच बचावकार्य सुरळीतपणे पार पाडण्यासाठी खांब ते कोलाडदरम्यानची महामार्ग वाहतूक सुमारे एक तास थांबविण्यात आली. सर्व यंत्रणांमधील समन्वय आणि तत्परतेमुळे रसायनाची गळती नियंत्रणात आणण्यात आली. त्यामुळे संभाव्य आग, स्फोट, जीवितहानी आणि मोठे आर्थिक नुकसान टळले.

**रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग**
**विशेष वसूली अधिकारी कार्यालय, पेण रायगड**

जा.क्र ७९३ **फॉम झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना.**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा पेण शहर चे विशेष वसुली अधिकारी या नात्यांने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको यांना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक १२/०७/२०२३ रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक १५/०७/२०२६ रोजी जप्ती सुचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री.राकेश कृष्णा म्हात्रे मु-काश्मिरे, पो-कांदळेपाडा, ता. पेण, रायगड यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सुचनेत नमुद केलेली दिनांक १५/०३/२०२३ पर्यंतची रक्कम रूपये १६,३५,०१९/- व दिनांक १६/०३/२०२३ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची परतफेड सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसूलीच्या तारखेपर्यंत त्यावरील ११.५० टक्के व्याज दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती झालेली मिळकत जप्त केलेली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्यांने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ चा उपनियम (११ डी -१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकांराचा वापर करून
श्री.राकेश कृष्णा म्हात्रे यांच्या नावाची खालिल वर्णनाची जमिन.
ग्रुप ग्रामपंचायत मळेघर ता. पेण मालमत्ता क्र.२०४/ब क्षेत्रफळ ७२६ चौ.फुट

येथील खालिल मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा वडखळ च्या दिनांक १५/०३/२०२३ रोजी येणे रक्कम रूपये १६,३५,०१९/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- श्री.राकेश कृष्णा म्हात्रे**
श्री. राकेश कृष्णा म्हात्रे यांच्या नावाची खालिल वर्णनाची जमिन.
- ग्रुप ग्रामपंचायत मळेघर ता. पेण मालमत्ता क्र.२०४/ब क्षेत्रफळ ७२६ चौ.फुट

स्थळ : पेण सही/-
दिनांक : १५/०९/२०२६ **श्री.अजित नामदेव भगत**
वसूली व विक्री अधिकारी पेण रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग

**रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग**
**विशेष वसूली अधिकारी कार्यालय, पेण रायगड**

जा.क्र ७९४ **फॉम झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना.**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा पेण शहर चे विशेष वसुली अधिकारी या नात्यांने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक १४/०७/२०२३ रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक १०/०७/२०२६ रोजी जप्ती सुचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री. विशाल दत्तात्रेय मोकल मु-उचेडे, पो-कांदळेपाडा, ता. पेण, रायगड यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सुचनेत नमुद केलेली दिनांक १५/०३/२०२३ पर्यंतची रक्कम रुपये ७,७८,५५३/- व दिनांक १६/०३/२०२३ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची परतफेड सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसूलीच्या तारखेपर्यंत त्यावरील १४ टक्के व्याज दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती झालेली मिळकत जप्त केलेली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्यांने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ चा उपनियम (११ डी-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकांराचा वापर करून
श्री. विशाल दत्तात्रेय मोकल यांच्या नावाची खालिल वर्णनाची जमिन.
ग्रुप ग्रामपंचायत कांदळे ता. पेण मालमत्ता क्र.६३० क्षेत्रफळ १५०० चौ. फुट

येथील खालिल मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा वडखळ च्या दिनांक १५/०३/२०२३ रोजी येणे रक्कम रूपये ७,७८,५५३/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- श्री. विशाल दत्तात्रेय मोकल**
श्री. विशाल दत्तात्रेय मोकल यांच्या नावाची खालिल वर्णनाची जमिन
- ग्रुप ग्रामपंचायत कांदळे ता.पेण मालमत्ता क्र.६३० क्षेत्रफळ १५०० चौ.फुट

स्थळ : पेण सही/-
दिनांक : १५/०९/२०२६ **श्री.अजित नामदेव भगत**
वसूली व विक्री अधिकारी पेण रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग

## निवडक

### पनवेलमध्ये नागरी समस्यांचा डोंगर



**खांदेश्वर :** नवीन पनवेलमध्ये रस्त्यांची दुरवस्था, वाहतूक कोंडी, पार्किंगचा अभाव, कमी दाबाने होणारा दूषित पाणीपुरवठा आणि फूटपाथची कमतरता यामुळे नागरिक त्रस्त आहेत. तसेच, गणपती आगमनाच्या काळातही खड्डेमय रस्त्यांवरून मार्ग काढावा लागत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. नवीन पनवेल प्रभाग क्रमांक १७ येथील काली माता मंदिर ते बांठीया शाळा मार्गावर मोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे विद्यार्थी, नागरिक आणि वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत असून, दुचाकीस्वारांच्या अपघाताचा धोका वाढला आहे. सेक्टर १३ मधील अंतर्गत रस्ते, पाण्याच्या टाकीकडे जाणारे मार्ग, तसेच नवीन पनवेल रेल्वे स्थानक परिसरातील सेक्टर १५ मधील रस्त्यांचीही अशीच दुरवस्था झाली आहे. त्याचबरोबर सेक्टर १३, १४, १५, १७, १८ आणि १९ परिसरात पुरेशा पार्किंग सुविधेअभावी वाहने रस्त्याच्या दुतर्फा उभी केली जातात. त्यामुळे रस्ते अरुंद होऊन वाहतूक कोंडी निर्माण होते. घंटागाडी आल्यानंतर ही समस्या आणखी तीव्र होत असल्याचे नागरिकांनी सांगितले. सेक्टर १७ मधील पीएल फाय परिसरात कमी दाबाने पाणीपुरवठा होत असून, काही ठिकाणी दूषित पाणी येत असल्याच्या तक्रारी आहेत. तसेच, नवीन पनवेल रेल्वे स्थानक परिसरात सुरक्षित फूटपाथ नसल्याने पादचाऱ्यांना रस्त्यावरून चालावे लागते. त्यातच फूटपाथवर वाहने उभी केली जात असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. त्यामुळे प्रभागातील समस्यांकडे प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. रस्त्यांची दर्जेदार दुरुस्ती, कायमस्वरूपी पार्किंग व्यवस्था, शुद्ध पाणीपुरवठा आणि फूटपाथ अतिक्रमणमुक्त करण्यासाठी महापालिकेने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.



### बाप्पाच्या भेटीसाठी चाकरमान्यांची धाव

**खांदेश्वर :** गणेशोत्सव आणि कोकणातील चाकरमान्यांचे नाते हे वर्षानुवर्षांचे आहे. बाप्पाच्या आगमनाची चाहूल लागताच मुंबई, नवी मुंबईसह पनवेल परिसरातून चाकरमानी कोकणच्या दिशेने रवाना होऊ लागले आहेत. सोमवारी (दि.१४) देखील पनवेल रेल्वे स्थानकावर चाकरमान्यांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. पनवेल स्थानकावर कोकणाकडे जाणाऱ्या गाड्यांकडे प्रवाशांचे लक्ष लागले होते. विशेषतः दिवासावंतवाडी एक्स्प्रेसला प्रवाशांची मोठी गर्दी होती. गाडी येताच प्रवाशांनी आपापले सामान घेऊन डब्यांकडे धाव घेतली. यावेळी हातात सामान, डोक्यावर बॅगा आणि सोबत लहान मुले घेऊन कुटुंबे रेल्वे स्थानकावर दाखल झाली होती.रेल्वेत जागा मिळेल की नाही, याची चिंता असली तरी बाप्पाच्या भेटीसाठी कोकण गाठायचेच, असा निर्धार प्रवाशांमध्ये दिसून आला. यावेळी बाप्पाच्या आगमनासाठी गावाकडे जाणाऱ्या चाकरमान्यांच्या गर्दीने पनवेल स्थानक गजबजून गेले.

### पनवेलमध्ये गणेशोत्सवाचा उत्साह



**खांदेश्वर :** गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर सोमवारी (दि.१४)पनवेल परिसरात गणरायाचे जल्लोषात आगमन झाले.गणेशोत्सवासाठी गेल्या अनेक दिवसांपासून तयारी करणाऱ्या सार्वजनिक गणेश मंडळांचा उत्साह शिगेला पोहोचला होता. मोठमोठ्या गणेशमूर्ती मंडळाच्या आकर्षक सजविलेल्या मंडपांमध्ये विराजमान करण्यात आल्या. सोमवारी ढोल-ताशांचा गजर, फटाक्यांची आतषबाजी आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. सार्वजनिक मंडळांच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या भक्तिभावाने आपल्या लाडक्या बाप्पाला मंडपात आणले. दरम्यान, घरगुती गणपतींच्या आगमनासाठीही सकाळपासूनच नागरिकांची लगबग सुरू होती. महिला आणि बालकांनी बाप्पाच्या स्वागतासाठी घरांची आकर्षक सजावट केली होती. फुलांच्या माळा, रांगोळी आणि विद्युत रोषणाईने अनेक घरांचे अंगण सजले होते. काही कुटुंबांनी ढोल-ताशांच्या गजरात तर काहींनी पारंपरिक वाद्यांच्या साथीने गणरायाचे स्वागत केले. 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषात घराघरांत श्री गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात आली.

# ऐन गणेशोत्सवात सावित्री नदी प्रदुषित

**| महाड | प्रतिनिधी |**

महाड एमआयडीसी परिसरातील औद्योगिक प्रदूषणाबरोबरच सावित्री नदीच्या प्रदूषणाचा गंभीर प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या नदीमध्ये प्रक्रिया न केलेले रासायनिक सांडपाणी सोडले जात असल्याचा आरोप महाड शहर विकास मंचाने केला आहे. तसेच, मोठ्या प्रमाणात मासे व इतर जलचर मृत्युमुखी पडत असल्याचे देखील मंचाने प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे. त्यातच गणेशोत्सव काळात या नदीपात्रात गणपतींचे मोठ्या प्रमाणात विसर्जन केले जाते. मात्र, या प्रदुषित पाण्यात बाप्पाचे विसर्जन केल्यास मानवी आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

महाड एमआयडीसीमध्ये औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सीईटीपी प्रकल्प कार्यान्वित आहे. तरी देखील काही आस्थापनांकडून रात्रीच्या वेळी अथवा छुप्या मार्गाने प्रक्रिया न केलेले सांडपाणी सावित्री नदीत सोडले जात आहे, असा गंभीर आरोप महाड शहर विकास मंचाकडून करण्यात आला आहे. या प्रकारामुळे नदीचे पाणी दूषित होत असून, जलचरांच्या अस्तित्वावर मोठा परिणाम होत आहे. तसेच, सावित्री नदीवर परिसरातील कोळी बांधव आणि मच्छिमारांचा रोजगार मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. मात्र, नदीतील प्रदूषणामुळे मासेमारी व्यवसायावर परिणाम होण्याबरोबरच दूषित पाण्यातील मासे मानवी आहारात गेल्यास नागरिकांच्या आरोग्यालाही धोका निर्माण होऊ शकतो, अशी चिंता मंचातर्फे व्यक्त करण्यात आली आहे.

या प्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने तातडीने नदीची पाहणी करून पाण्याचे नमुने तपासावेत, मृत जलचरांची पाहणी करावी. तसेच, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांचा शोध घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. दोषी आस्थापना आढळल्यास त्यांच्यावर पर्यावरणीय कायद्यानुसार कठोर कारवाई करून आवश्यक असल्यास उत्पादन बंद करण्याचे आदेश द्यावेत, अशीही मागणी करण्यात आली आहे. तसेच, प्रदूषणाच्या या प्रकाराकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्यास प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांमध्ये नाराजी आणि अविश्वास निर्माण होत असल्याचे मंचाने म्हटले आहे. या प्रकरणामुळे ऐन गणपती उत्सवाच्या काळात महाड एमआयडीसीतील औद्योगिक प्रदूषणाचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला असून, प्रशासन आता कोणती भूमिका घेते आणि नदी प्रदूषणाला जबाबदार घटकांवर काय कारवाई केली जाते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.



- **रासायनिक सांडपाणी सोडल्याचा आरोप**
- **महाड शहर विकास मंच आक्रमक**

> महाडमध्ये गणपती बाप्पाचे आगमन झाले असून, मंगळवारी दिड दिवसांच्या बाप्पांचे विसर्जन होत आहे. मात्र, या दिवशी एक अपवित्र काम झाले आहे. काही आस्थापनांकडून सांडपाण्यावर कोणतीही कारवाई न करता ते थेट सावित्री नदी सोडण्यात आले आहे. यामुळे नदीतील पाण्याला लालसर रंग आला असून, नदी प्रदुषीत करण्यात आली आहे. याच विषारी पाण्यात गणपती बाप्पाचे विसर्जन केल्यास मानवी आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो. – **महिका मिंडे, स्थानिक रहिवासी**

### मंत्रालयात तक्रार करण्याचा इशारा

सावित्री नदीचे प्रदूषण, जलचरांचा मृत्यू आणि नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न अत्यंत गंभीर असून प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी भूमिका महाड शहर विकास मंचाने घेतली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने या तक्रारीची तातडीने दखल घेऊन कारवाई केली नाही, तर याप्रकरणी मंत्रालय स्तरावर गंभीर तक्रार करण्यात येईल, असा इशाराही मंचाच्यावतीने देण्यात आला आहे.

### कारवाईची मागणी

तहसीलदार कार्यालयाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन संबंधित दोषी आस्थापनांवर दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश द्यावेत. तसेच, महाड नगरपरिषदेनेही सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरणाच्या दृष्टीने या प्रकरणात पुढाकार घेऊन पोलीस ठाणे तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे अधिकृत तक्रार दाखल करावी, अशी मागणी महाड शहर विकास मंचातर्फे मुख्याधिकारी धनंजय कोळेकर यांच्याकडे करण्यात आली आहे.

## रोह्यातून १७ वर्षीय मुलगा बेपत्ता

**| नागोठणे | प्रतिनिधी |**



रोहा शहरातील दमखाडी परिसरातून दि.९ सप्टेंबर रोजी मध्यरात्रीच्या सुमारास १७ वर्षाचा आर्या चौधरी हा बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. आर्या याची उंची सुमारे १६७ सेंटीमीटर असून त्याचा रंग गोरा, चेहरा गोल, केस व डोळे काळे आहेत. त्याने हिरव्या रंगाचा फुल्ल शर्ट, खाकी रंगाची पँट आणि पावसाळी बूट परिधान केले होते. तसेच, त्याच्याकडे आयफोन-१५ मोबाईल असल्याचे कुटुंबीयांनी सांगितले आहे. याप्रकरणी रोहा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, रोहा पोलिसांकडून त्याचा शोध घेण्यात येत आहे.

## नगरपरिषदेची फायर बाईक धूळ खात

### प्रशासकीय नियोजनाअभावी बनली शोपीस

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन शहरासह परिसरातील अरुंद रस्ते तसेच संभाव्य वाहतूक कोंडीच्या ठिकाणी आपत्कालीन प्रसंगी "फर्स्ट रिस्पॉन्डर" म्हणून तात्काळ पोहोचण्यासाठी नगरपरिषदेत २०२४ साली अत्याधुनिक "रॉयल एनफिल्ड फायर बाईक" दाखल झाली आहे. मात्र, प्रशासकीय दुर्लक्षामुळे सध्या ती धूळ खात पडून असल्याचे चित्र समोर आले आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेसाठी आणलेली ही यंत्रणा केवळ शोपीस म्हणूनच राहिली आहे.

श्रीवर्धन मधील गल्लीबोळांमध्ये किंवा गर्दीच्या ठिकाणी आगीची घटना घडल्यास नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाचे अवजड वाहन वेळेत पोहोचणे कठीण जाते. यावर उपाय म्हणून उच्च क्षमतेची रॉयल एनफिल्ड फायर बाईक ही २०२४ साली नगरपरिषदेच्या अग्निशमन दलात दाखल करण्यात आली होती. या मॉडिफिकेशन बाईकवर हाय-प्रेशर वॉटर मिस्ट सिस्टीम, फॉम आणि अत्याधुनिक अग्निशमन उपकरणे बसवण्यात आली आहेत. या जड आणि अत्याधुनिक उपकरणांनी सज्ज असलेली बाईक चालवण्यासाठी आणि हाताळण्यासाठी कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षणाची आवश्यकता असते. मात्र, नगरपरिषदेकडे आवश्यक प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याने या दुचाकीचा वापर होत नाही. त्यातच वेळेवर योग्य देखभाल न झाल्याने आणि तांत्रिक अडचणींमुळे सध्या ही बाईक नादुरुस्त अवस्थेत पडून आहे. तसेच, आणीबाणीच्या काळात या बाईकचे कॉल मॅनेजमेंट आणि वाहतूक कोंडीतून कसा प्रभावी वापर करायचा, याची कोणतीही नियोजन यंत्रणा प्रशासनाकडे उपलब्ध नाही. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेसाठी आणलेली ही यंत्रणा केवळ शोपीस म्हणूनच राहिली आहे.



> ही फायर बाईक प्रशासकीय कार्यकालामध्ये आणण्यात आली होती. त्याकरिता लागणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्याकारणाने ती फायर बाईक वापरात नव्हती. सद्यस्थितीत त्यावर तोडगा काढण्यात आलेला असून, लवकरच ही फायर बाईक सेवेमध्ये रुजू होइल.
> – ॲड. अतुल चौगुले, नगराध्यक्ष, श्रीवर्धन नगरपरिषद

## ४५ दिवस उलटूनही आरोपी मोकाट

**| पेण | प्रतिनिधी |**

उद्योजक मयूर वनगे यांच्यावरील मारहाण आणि चोरी प्रकरणाला दि.१५ सप्टेंबर रोजी तब्बल दीड महिना पूर्ण झाला आहे. मात्र, या प्रकरणातील भारतीय जनता पक्षाचे दक्षिण उपाध्यक्ष मंगेश दळवी, हरेश दळवी आणि रूपेश दळवी हे तीन आरोपी अद्याप पोलिसांच्या हाती लागलेले नसल्याने पेणमध्ये पोलिसांच्या तपासाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या प्रकरणातील हरेश दळवी याने जिल्हा सत्र न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला होता. मात्र, न्यायालयाने त्याचा जामीन अर्ज फेटाळल्याची माहिती आहे. दरम्यान, मंगेश दळवी आणि रूपेश दळवी यांनी अद्याप जामिनासाठी अर्ज दाखल केलेला नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे न्यायालयीन प्रक्रियेत एकीकडे हालचाली सुरू असताना दुसरीकडे आरोपी अद्याप पोलिसांच्या हाती का लागत नाहीत, हा प्रश्न उपस्थित होत आहे. पेण पोलिसांनी यापूर्वी अनेक गुन्ह्यांतील आरोपींना काही तासांत किंवा काही दिवसांत अटक केल्याची उदाहरणे आहेत. तरीदेखील या प्रकरणातील आरोपींचा शोध घेण्यात तब्बल ४५ दिवस का लागत आहेत? पोलिसांच्या तपासाची गती नेमकी कुठे अडली आहे, असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. तसेच, या प्रकरणाच्या तपासावर कोणताही राजकीय दबाव आहे का, याबाबत अधिकृतपणे काहीही स्पष्ट झालेले नसले तरी पेणमध्ये या चर्चेला उधाण आले आहे. त्यामुळे पोलिसांनी या प्रकरणातील तपासाची सद्यस्थिती आणि आरोपींच्या अटकेसाठी केलेल्या कारवाईबाबत स्पष्ट माहिती जनतेसमोर मांडावी, अशी मागणी जोर धरत आहे.



## एसटी बंद केल्याने विद्यार्थ्यांची पायपीट

**| नेरळ | प्रतिनिधी |**

नेरळ ते कशेळे बस सेवा बंद केल्याने विद्यार्थ्यांची पुन्हा एकदा पायपीट सुरू करावी लागत आहे. तसेच, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शाळेचे नुकसान होत असून, कर्जत एसटी आगार प्रमुख यांच्यावर राजकीय दबाव असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, कर्जत एसटी आगाराने नेरळ कशेळे मार्गावर सुरू केलेली सर्व फेऱ्या कायम ठेवाव्यात अन्यथा रस्ता रोको आंदोलन केले जाईल, असा इशारा किसान क्रांती संघटना आणि आरपीआय आठवले गटाने दिला आहे.

नेरळ वाकस मार्गे कशेळे बस सेवा विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आली होती. विद्यार्थ्यांचे होणारी गैरसोय दूर होण्यासाठी तीन ऑगस्टपासून सेवा चालू करण्यात आली होती. त्यानंतर या मार्गावर राहणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांनी बस सेवेसाठी पास काढण्यात आले. विद्यार्थ्यांची शाळेत जाण्यासाठी होणारी पायपीट कमी व्हावी यासाठी बस सेवा सुरू करण्यात आली होती. तसेच, काही दिवसांपूर्वी प्रवाशांसाठीही अतिरिक्त फेऱ्या चालू केले होत्या. परंतु, त्या प्रवासी फेऱ्या बंद करून फक्त विद्यार्थ्यांसाठी बस सेवा सुरू ठेवण्यात आली होती. त्यानंतर पुन्हा शुक्रवार दि.११ सप्टेंबर सर्वच फेऱ्या बंद करण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांचे शालेय नुकसान होत आहे. त्यामुळे पाच किलोमीटर अंतरापासून प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांना बस सेवा बंद झाल्याने मुलांची शाळेत जाण्याची गैरसोय होत आहे. तसेच, शाळेमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांना काही रिक्षा व इको चालक घेत नसल्याची तक्रार देखील केली जात आहे. त्यामुळे विद्यार्थी प्रवाशाचा साधन बंद झाल्याने मुलांना घरी परतावे लागत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. दरम्यान, या मार्गावर अचानक एसटी गाड्या बंद केल्याने कर्जत एसटी आगार प्रमुखांवर स्थानिक रिक्षा चालकांच्या माध्यमातून राजकीय दबाव टाकला जात असल्याचे देखील बोलले जात आहे. त्यामुळे किसान क्रांती संघटना आणि आरपीआय संतप्त झाले असून, भविष्यात रस्ता रोको आंदोलन होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



## रस्त्यावर पडलेला खड्डा भरला

**| वेनगाव | प्रतिनिधी |**

कर्जत चार फाटा येथील नेरळ-माथेरान रस्त्याच्या मार्गावर मोठा खड्डा पडला होता. या खड्ड्यामुळे अनेक वाहन चालकांना दुखापत होऊन त्रास सहन करावा लागत होता. तसेच, या ठिकाणी बंदोबस्तीसाठी कार्यरत असलेल्या वाहतूक पोलिसांना मोठी डोकेदुखी ठरत होता. त्यामुळे हा खड्डा भरण्या संदर्भात वारंवार मागणी होत होती. मात्र, संबंधित प्रशासन याकडे दुर्लक्ष करत होते. त्यानंतर कर्जत चार फाटा येथील नेरळ-माथेरान रस्त्याच्या मार्गावर मोठा खड्डा पडला असल्याचे वृत्त शुक्रवारी (दि.११) 'कृषिवल'मध्ये प्रसिद्ध झाले होते. त्यानंतर या वृत्ताची दखल घेत संबंधित विभागाने तात्काळ हा खड्डा भरण्याच्या कामाला सुरवात केली. तसेच, परिसरातील खड्डे देखील भरण्यात आले आहेत. त्यामुळे वाहन चालक, प्रवासी वर्ग तसेच येथे कार्यरत असलेले पोलीस कर्मचारी यांनी 'कृषीवल'चे आभार मानले आहेत.









**६ हजार प्रकरणे सामंजस्याने निकाली | ४४.६४ कोटींहून अधिक रकमेची तडजोड**

# लोक अदालतीत पनवेलची उल्लेखनीय कामगिरी

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल न्यायालयात प्रलंबित तसेच दाखलपूर्व वादांचा जलद, सुलभ आणि सामंजस्यपूर्ण निपटारा व्हावा, पक्षकारांचा वेळ व खर्च वाचावा आणि परस्पर संवादातून वादांना कायमस्वरूपी पूर्णविराम मिळावा, या उद्देशाने पनवेल येथील जिल्हा व सत्र न्यायालयात आयोजित राष्ट्रीय लोक अदालतीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या अदालतीत दाखलपूर्व व न्यायालयीन प्रलंबित अशी एकूण ६ हजार २७ प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात आली. तसेच, प्रकरणांमध्ये तब्बल ४४ कोटी ६४ लाख ५७ हजार ६३२ रुपयांची तडजोड करण्यात आली.



या राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा रायगड जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती मिलिंद साठ्ये, न्यायमूर्ती तथा जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती अद्वैत सेठना तसेच अलिबागचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष एस.बी. अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या अदालतीचे उद्घाटन न्यायमूर्ती मिलिंद साठ्ये यांच्या हस्ते दृकश्राव्य माध्यमातून झाले. यावेळी पनवेल न्यायालयातील न्यायिक अधिकारी, जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश-१ तथा तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष विमलनाथ तिवारी, पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. रत्नदीप पाटील तसेच कार्यकारिणीचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रीय लोक अदालतीसाठी एकूण सात लोक अदालत कक्ष स्थापन करण्यात आले होते. या कक्षांमध्ये एस.आर. चव्हाण, डी.एम. डोंगरे, आर.एन. चव्हाण, ए.एस. वाडकर, आर.वाय. खंडारे, पी.के. राठोड आणि एस.यू. जागुष्टे या न्यायिक अधिकाऱ्यांनी कामकाज पाहिले. तसेच, ॲड. इंद्रजित भोसले, ॲड. भूषण म्हात्रे, ॲड. शशिकांत म्हात्रे, ॲड. प्रज्ञा भगत, ॲड. अदील चौधरी, ॲड. सुयश कामेरकर आणि ॲड. सुनील तोटावाड यांनी पंच म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली.

### १५ हजार प्रकरणे अदालतीसमोर

राष्ट्रीय लोक अदालतीसमोर ७ हजार ७१८ दाखलपूर्व आणि ७ हजार ५१७ न्यायालयीन प्रलंबित, अशी एकूण १५ हजार २३५ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी १ हजार ९४९ दाखलपूर्व आणि ४ हजार ७८ प्रलंबित, अशी एकूण ६ हजार २७ प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात आली. दाखलपूर्व प्रकरणांमध्ये ३८ लाख ७० हजार २५८ रुपये, तर प्रलंबित प्रकरणांमध्ये ४४ कोटी २५ लाख ८७ हजार ३७४ रुपये इतक्या रकमेची तडजोड झाली. अशा प्रकारे एकूण ४४ कोटी ६४ लाख ५७ हजार ६३२ रुपयांची तडजोड करण्यात आली.

# म्हणे 'समान नागरी'...

पुढच्या लोकसभा निवडणुकांच्या आत भाजप आघाडीची सत्ता असलेल्या सर्व एकवीस राज्यांमध्ये समान नागरी कायदा लागू होईल असे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी रविवारी मुंबईत सांगितले. त्याला सर्व वृत्तपत्रांनी ठळक प्रसिध्दी दिली. गंमत अशी की, हा कायदा समान असेल तर तो प्रत्येक राज्यामध्ये वेगवेगळा का केला जात आहे आणि केंद्र सरकारच हा कायदा का बरे आणत नाही असा प्रश्न अमित शहा यांना कोणी विचारत नाही. विचारला तरी शहा त्याचे थेट उत्तर देणार नाहीत. याचे कारण भाजपवाले कितीही समान म्हणून ढोल-ताशे वाजवत असले तरी हा कायदा प्रत्येक राज्यातदेखील वेगवेगळा राहणार आहे. आतापर्यंत उत्तराखंड, गुजरात, मध्य प्रदेश आणि आसाम या चार राज्यांमध्ये भाजपच्या सरकारांनी समान नागरी कायदा आणला आहे. पण या सर्वांनी आदिवासी समुहांना मात्र तो लागू केलेला नाही. त्या समुहांना यातून वगळण्यात आले आहे. त्यांना आपापल्या चालीरीतींप्रमाणे वागण्याची मुभा देण्यात आली आहे. उत्तराखंडमध्ये आदिवासींव्यतिरिक्त आणखीही काही समाजांना यातून वेगळे काढून त्यांच्या पध्दतीने जगण्याला परवानगी देण्यात आली आहे. म्हणजे समान म्हणवला जाणारा कायदा त्या त्या राज्यातदेखील समान नाही. उत्तर प्रदेश हे भाजपच्या कबजात असलेले मोठे राज्य आहे. तेथे योगी आदित्यनाथ हे विरोधकांवर सरसकट बुलडोझर चालवत असतात. पण या राज्यामध्येही समान नागरी कायदा आणण्याचे धाडस भाजपला अजून झालेले नाही. याचे कारण या राज्यामध्ये जातीजातींमध्ये असलेला कमालीचा भेद किंवा निराळेपणा. तमाम सर्व प्रगती झाली तरीही उत्तर प्रदेशातील ब्राह्मण, राजपूत, कायस्थ इत्यादींची पकड मजबूत आहे. दलित जातींचा वेगळेपणा कायम आहे. अलिकडे, आपण एकजूट झालो तर लखनौतील सत्ता उलटीपालटी करू शकतो याची जाणीव तेथील तथाकथित खालच्या जातींना झाली आहे. त्यामुळे त्यांचा राजकीय प्रभाव वाढला आहे. अगदी परवाच तेथील एका निषाद म्हणजे कोळी जातीच्या एका व्यापाऱ्याची गोंडी जिल्ह्यात हत्या झाली म्हणून राज्याचे मंत्री संजय निषाद यांनी आंदोलन केले. त्यांची निषाद पार्टी भाजपसोबत सत्तेत आहे, पण तिचा आदित्यनाथांना सुप्त विरोध आहे. शिवाय निषाद आणि उच्च जातीयांचे अजिबात जमत नाही.

### जातींचा वेगळेपणा

निषादांसारख्या असंख्य मजबूत जाती व जमाती उत्तर प्रदेशात आहेत. त्यांना एकत्र घेऊन समान नागरी कायदा करणे सोपे नाही. आदिवासींप्रमाणे या जातींनाही कायद्यातून वगळावे लागेल किंवा त्यांच्या चालीरीती चालू ठेवण्याची परवानगी द्यावी लागेल. या स्थितीत त्या कायद्याला समान असे म्हणण्याला काहीच अर्थ उरणार नाही. पण भाजपला हे केवळ निवडणुकीच्या प्रचारापुरते करायचे आहे. जनसंघाच्या काळापासून समान नागरी कायद्याच्या नावाने हे लोक बोंबलत आहेत. असा कायदा येणे कठीण आहे हे तेव्हाही सर्वांनी यांना सांगून झालेले आहे. पण यांना निव्वळ याचा राजकीय फायदा उठवायचा आहे. आता महाराष्ट्रातही येत्या हिवाळी अधिवेशनात समान नागरी कायद्याचा मसुदा मांडला जाईल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले आहे. त्याला विरोध झाला की हा हिंदूंना विरोध आणि मुस्लिमांना पाठिंबा असा गजर करायला भाजपवाले मोकळे होतील. वास्तविक या देशात फौजदारी व दिवाणी कायदा सर्वांना समान आहे हे अनेकदा सांगून झाले आहे. एखाद्याने चोरी केली तर तो कोणत्याही जातीधर्माचा असला तरी त्याला देशभरात सारखीच कलमे लागतात व त्याखाली खटला भरला जातो. दुसरीकडे समजा कंपनीच्या मालकीचा प्रश्न निर्माण झाला तर वादातली मंडळी कोणत्याही जातीधर्माची असली तरी त्यांना देशभर एकाच दिवाणी कायद्याखाली खटले भरावे लागतात वा त्यांना उत्तर द्यावे लागते. समान नागरी कायदा हा मुख्यतः वैयक्तिक बाबींसंदर्भात आहे. लग्न, घटस्फोट आणि वारसा हक्क या त्या बाबी आहेत. यामध्ये देखील त्या त्या जाती वा धर्माच्या चालीरीतींप्रमाणे या गोष्टी करण्याचे स्वातंत्र्य असले तरी मुख्य कायद्याची बंधने लागू राहतातच. म्हणजेच, याही जातीधर्मातील लोकांमधील १८ वर्षांच्या आतील मुलामुलींची लग्ने ही बेकायदाच ठरतात. किंवा समजा पारशी किंवा जैनांच्या प्रथेप्रमाणे संपत्तीचे वाटप झाले आणि नंतर त्यात विवाद निर्माण झाला तर तो खटला पुन्हा इथल्याच न्यायव्यवस्थेपुढे सुनावणीसाठी येतो.


### द्वेष आणि प्रचार

त्यामुळे या नागरी कायद्यातील समान हा शब्द फसवा आणि निरर्थक आहे. मुळात मुस्लिम समाजाच्या द्वेषातून या कायद्याची मागणी निर्माण झाली. मुसलमानांना सरसकट चार बायका करू शकतात व ते तोंडी तलाक देऊन घटस्फोटही देतात अशी उदाहरणे देऊन या कायद्याचे समर्थन केले जात असे. वास्तविक मुस्लिम समाजातील काही टक्केच लोक बहुपत्नीक असतात हे पुरेसे सिध्द झाले आहे. तसेच अशा कुटुंबांमुळे तो समाज अधिकाधिक मागास राहतो हेही दिसले आहे. तरीही त्यांना परवानगी आहे तर आम्हाला का नाही अशी एक बालिश मत्सराची भावना भाजपने हिंदू समाजात या निमित्ताने निर्माण केली व काँग्रेसी सरकारांनी पुरेसे प्रबोधन न केल्यामुळे काँग्रेस जणू मुस्लिमांना अवाजवी संरक्षण देत आहे अशी प्रतिमा तयार झाली. त्यातून मग समान नागरी कायदा करणे हे काहीतरी शौर्याचे काम असून भाजपच ते करू शकतो असे वातावरण निर्माण झाले. ते अजूनही कायम आहे. त्याचाच फायदा अमित शहा वगैरे मंडळी घेत आहेत. पुढच्या निवडणुकांना सामोरे जाताना, आम्ही हे शौर्य गाजवले आहे अशी जाहिरात करायला मिळावी हाच यामागचा एकमेव हेतू आहे. अन्यथा, २०१९ मध्ये विक्रमी बहुमत असूनही भाजपने केंद्रातच हा कायदा का केला नाही असा प्रश्न निर्माण होतो. आता भाजपवाल्यांनी आपले आश्वासन पाळले, काँग्रेस व विरोधक मात्र या कायद्यातील अडथळा आहेत असे भाजपला दाखवायचे आहे. पण ते तितकेसे सोपे नाही. आंध्र प्रदेशात चंद्राबाबू नायडू यांचा तेलुगू देसम आणि बिहारमध्ये नीतीशकुमार यांचा या कायद्याला सहजासहजी पाठिंबा मिळणार नाही. तिथे अनेक अटीशर्ती घालून आणि अनेक समुहांना वगळूनच हा कायदा होऊ शकेल. कदाचित मुस्लिमांनाही स्वतंत्र सवलती द्याव्या लागतील. थोडक्यात तिथला कायदा हा नावालाच समान असेल. ईशान्येकडील राज्यांमध्ये तर अधिक तीव्र विरोध आहे. तेथील लग्न, घटस्फोट आणि वारसा यांच्या प्रथा एकेका राज्यांतील वेगवेगळ्या भागात निरनिराळ्या आहेत. आणि तेथील आदिवासी समुदाय याबाबत कडवे आहेत. या गोष्टी दडवून ठेवून भाजपवाले भाडोत्री मिडियाच्या जोरावर आपण कसे शौर्य गाजवले याची टिमकी नक्की वाजवतील. पण त्यात अर्थ नसेल. ३७० वे कलम रद्द झाल्यानंतर काश्मिरात स्वर्ग अवतरणार होता. दहशतवाद नष्ट होणार होता. ते झालेले नाही. पुलवामाचा हल्ला किंवा नवी दिल्लीतील बॉंबस्फोट ही त्याची उदाहरणे आहेत. काश्मीरला स्वतंत्र राज्याचा दर्जा दिला गेलेला नाही. तेथे अजूनही लष्करी जोरावरच राज्य ताब्यात ठेवले आहे. पण ३७० रद्द केले हा प्रचार मात्र जोरात असतो. अयोध्येतही मंदिर तर झाले, पण तिथे हिंदू मंडळींनीच शेकडो कोटींचा दरोडा घातला. समान नागरी कायद्याचेही हेच होणार आहे.

## विचार

# सोनिया गांधींच्या पुस्तकाआडचे राजकारण

***सोनिया गांधी यांच्या बहुप्रतीक्षित 'बिलॉंगिंग: ए जर्नी ऑफ लव्ह' या आत्मकथनाभोवती निर्माण झालेला वाद हा केवळ एका पुस्तकाच्या प्रकाशनाचा प्रश्न राहिलेला नाही. तो अभिव्यक्तिस्वातंत्र्य, प्रकाशकाची संपादकीय जबाबदारी, राजकीय नेत्यांच्या आत्मकथनातील वस्तुनिष्ठता आणि सत्तेच्या दबावाच्या आरोपांपर्यंत पोहोचला आहे. पुस्तक प्रकाशित झाले नसतानाच कथित संदर्भांवरून राजकीय रणकंदन सुरू झाले.***




**अजय तिवारी**

सोनिया गांधी यांचे 'बिलॉंगिंग: ए जर्नी ऑफ लव्ह' हे पुस्तक १० नोव्हेंबर २०२६ रोजी अमेरिकेतील अल्फ्रेड ए. नॉफ या प्रकाशनगृहाकडून प्रकाशित होणार आहे. नॉफ हे पेंग्विन रॅंडम हाऊस समूहाचा भाग आहे. पुस्तकाची पहिली आवृत्ती एक लाख प्रतींची असणार असल्याचेही जाहीर झाले. सोनिया यांनी या आत्मकथनात युद्धोत्तर इटलीतील बालपणापासून भारतातील आगमन, राजीव गांधींसोबतचा विवाह, इंदिरा गांधींची सून म्हणून आलेले अनुभव, राजीव गांधी आणि इंदिरा गांधी यांच्या हत्या, स्वतःचा राजकारणातील प्रवेश आणि २००४ मध्ये पंतप्रधानपद स्वीकारण्यास दिलेला नकार अशा अनेक महत्त्वाच्या टप्प्यांचा वेध घेतला आहे. पुस्तकाचे महत्त्व एवढ्यावरच थांबत नाही. गेल्या सहा दशकांमध्ये भारतातील सामाजिक आणि राजकीय बदल आपण प्रत्यक्ष अनुभवले असल्याने त्याचा स्वतःचा दृष्टिकोन या पुस्तकातून मांडण्याचा प्रयत्न केला असल्याचे सोनिया यांनी म्हटले आहे. त्यामुळे हे केवळ कौटुंबिक आठवणींचे पुस्तक नसून भारतीय राजकारणातील एका प्रदीर्घ पर्वाचे प्रत्यक्ष साक्षीदार असलेल्या व्यक्तीचे आत्मकथन ठरणार आहे; मात्र या पुस्तकाच्या भारतातील प्रकाशनावरूनच वादाची ठिणगी पडली. प्रकाशित झालेल्या वृत्तांनुसार, 'पेंग्विन रॅंडम हाऊस इंडिया'ने पुस्तकाच्या हस्तलिखितातील काही भागांमध्ये संपादकीय बदल आणि काही मजकूर वगळण्याची सूचना केली होती. त्यावर सोनिया यांनी आक्षेप घेतल्याचे वृत्त आहे. या मतभेदांनंतर 'पेंग्विन इंडिया' भारतात हे पुस्तक प्रकाशित करणार नसल्याचे समोर आले. आता भारतातील प्रकाशनासाठी इतर प्रकाशकांमध्ये स्पर्धा असून 'हार्परकॉलिन्स करारा'च्या अंतिम टप्प्यात असल्याचे वृत्त आहे.

पुस्तकातील वादग्रस्त भागांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भारत-चीन संबंध आणि चीनच्या भारतीय भूभागातील घुसखोरीसंबंधी संदर्भ असल्याचे सांगितले जाते. सोनिया यांनी हे भाग काढून टाकण्यास किंवा बदलण्यास नकार दिल्यामुळे कराराचा प्रश्न निर्माण झाल्याचे वृत्त आहे; मात्र या सर्व कथित मजकुराचा पूर्ण तपशील सार्वजनिक झालेला नाही, म्हणूनच या वादात तथ्य आणि राजकीय आरोप यांच्यात स्पष्ट सीमारेषा आखणे आवश्यक आहे. 'पेंग्विन रॅंडम हाऊस इंडिया'ने या प्रकरणी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. आपण भारतातील 'बिलॉंगिंग: ए जर्नी ऑफ लव्ह' चे प्रकाशक नाही, असे संस्थेने म्हटले आहे. तसेच, सोनिया यांनी संपादकीय बदल नाकारल्यामुळे 'पेंग्विन'ने पुस्तक प्रकाशित करण्याचा निर्णय टाळला, असे म्हणणे योग्य नसल्याचेही संस्थेने स्पष्ट केले आहे. प्रकाशकाच्या मते, हस्तलिखिताची तथ्यपडताळणी करणे आणि लेखकाला संपादकीय सूचना देणे हा प्रकाशन प्रक्रियेचा सामान्य भाग आहे. उलट, संबंधित चर्चेदरम्यान भारतातही हे पुस्तक प्रकाशित करण्यास आपण इच्छुक होतो, असे 'पेंग्विन'ने म्हटले आहे; मात्र लेखकासोबतच्या चर्चा गोपनीय असल्यामुळे नेमक्या कोणत्या भागावर काय चर्चा झाली, हे सांगण्यास संस्थेने नकार दिला आहे. ही भूमिका महत्त्वाची आहे. कारण एखाद्या प्रकाशकाने संपादकीय सूचना देणे म्हणजे सेन्सॉरशिप असे आपोआप ठरत नाही.

पुस्तकाच्या प्रकाशनापूर्वी तथ्यपडताळणी, कायदेशीर जोखीम, बदनामीचा धोका, संदर्भांची अचूकता आणि भाषिक-संपादकीय सुसंगती तपासणे हा प्रकाशकाचा अधिकारच नव्हे, तर काही प्रमाणात त्याचा व्यावसायिक आणि नैतिक दायित्वाचाही भाग आहे; परंतु दुसरीकडे संपादकीय सूचना आणि राजकीय दबावाखाली केलेली मजकूरकपात यामध्ये जमीन-अस्मानाचा फरक आहे. याच फरकावर या वादाचे गांभीर्य अवलंबून आहे. काँग्रेसने हे प्रकरण अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा प्रश्न बनवले आहे. काँग्रेसच्या नेत्यांनी आरोप केला आहे, की मोदी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि चीनसंबंधी संदर्भ काढून टाकण्यासाठी प्रकाशकावर दबाव आणण्यात आला. काही नेत्यांनी तर हा प्रकार लोकशाही आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्यासाठी गंभीर धोक्याचे लक्षण असल्याचे म्हटले आहे; पण काँग्रेसच्या या आरोपांनाही एक मूलभूत अडचण आहे. दबाव कोणी आणला, कसा आणला आणि त्याचा ठोस पुरावा काय, याचे उत्तर सध्या सार्वजनिक क्षेत्रात उपलब्ध नाही. उलट, 'पेंग्विनने'च दबावाचा आरोप नाकारला नसला, तरी तो स्पष्टपणे स्वीकारलेलाही नाही. संस्थेने केवळ चर्चेचे स्वरूप गोपनीय असल्याचे सांगितले आहे. भाजपनेही हा वाद सोडलेला नाही. भाजप नेत्यांनी आत्मकथनातील मजकुराच्या विश्वासार्हतेवरच प्रश्न उपस्थित केले आहेत. आत्मचरित्र आहे, की काल्पनिक कथन, असा उपरोधिक सवालही करण्यात आला आहे. तसेच 'अभिव्यक्तिस्वातंत्र्य धोक्यात' या काँग्रेसच्या आरोपामागे राजकीय हेतू असल्याचे भाजपकडून म्हटले गेले आहे.

एकंदरीत, पुस्तक बाहेर येण्यापूर्वीच दोन राजकीय कथानके तयार झाली आहेत. काँग्रेससाठी हे 'सत्य दडपण्याचा प्रयत्न' ठरत असून भाजपसाठी हे 'राजकीय कथानक उभे करण्याचा प्रयत्न' ठरत आहे. दोन्ही बाजूंना पुस्तकापेक्षा त्याचा राजकीय उपयोग अधिक महत्त्वाचा वाटतो आहे, हीच या प्रकरणातील विडंबना आहे. या वादाकडे पाहताना आत्मचरित्राचे स्वरूपही समजून घेणे आवश्यक आहे. आत्मचरित्र म्हणजे न्यायालयीन जबाब किंवा सरकारी श्वेतपत्रिका नाही. ते लेखकाच्या स्मृती, अनुभव, निरीक्षण आणि आकलनातून तयार झालेले कथन असते. त्यात लेखकाचा दृष्टिकोन असतोच. म्हणून सोनिया यांच्या पुस्तकात मोदी, भाजप, संघ, चीन किंवा काँग्रेसच्या राजकारणाविषयी त्यांचे मत असेल, तर ते मांडण्याचा त्यांना अधिकार आहे; पण त्याच वेळी त्या मतांना तथ्यांचा आधार आहे का, संदर्भ योग्य आहेत का, आरोपांची पुष्टी करणारे पुरावे आहेत का, याची पडताळणी करण्याचा अधिकार प्रकाशकाला आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणजे तथ्य पडताळणीपासून मुक्तता नव्हे आणि तथ्यपडताळणी म्हणजे सेन्सॉरशिपही नव्हे. या दोन टोकांमध्येच खरी लोकशाही उभी राहते. मग राजकारण कुठे सुरू होते? राजकारण पुस्तकाच्या हस्तलिखितात आहे की त्याभोवतीच्या प्रतिक्रियांमध्ये, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. सोनिया या भारतीय राजकारणातील अत्यंत प्रभावशाली व्यक्तिमत्त्व राहिल्या आहेत. नेहरू-गांधी परिवाराशी त्यांचे नाते, राजीव गांधींच्या निधनानंतरची त्यांची भूमिका, काँग्रेसचे नेतृत्व, 'यूपीए'चा काळ आणि २००४ मधील पंतप्रधानपदाचा निर्णय यामुळे त्यांच्या आत्मकथनाला राजकीय वजन असणारच.

विशेषतः २००४ नंतरच्या काँग्रेसच्या राजकारणाबद्दल त्यांचा प्रत्यक्ष अनुभव देशाच्या राजकीय इतिहासाचा महत्त्वाचा स्रोत ठरू शकतो; पण त्याच वेळी हे आत्मकथन त्यांच्या स्वतःच्या दृष्टिकोनातून आलेले असल्यामुळे त्यातील प्रत्येक विधान अंतिम ऐतिहासिक सत्य मानणे योग्य ठरणार नाही. इतिहासकारांसाठी अशा आत्मकथनांचे महत्त्व वेगळे असते. ते इतर कागदपत्रे, सरकारी नोंदी, समकालीन वृत्तपत्रे, इतर नेत्यांची आत्मचरित्रे आणि उपलब्ध पुरावे यांच्याशी पडताळून पाहिले जातात, म्हणून पुस्तक प्रकाशित होण्यापूर्वीच त्याला 'सत्याचा दस्तावेज' किंवा 'राजकीय प्रचार' अशी शिक्कामोर्तब करणे दोन्ही चुकीचे आहे. या प्रकरणात सर्वात मोठी गरज आहे ती पारदर्शकतेची. 'पेंग्विन'ने जर काही मजकुराबाबत तथ्यपडताळणीची गरज व्यक्त केली असेल, तर प्रकाशनविश्वात ते असामान्य नाही; पण जर विशिष्ट राजकीय व्यक्ती किंवा सत्ताकेंद्राच्या दबावामुळे मजकूर बदलण्याचा आग्रह झाला असेल, तर त्याचे पुरावे समोर येणे आवश्यक आहे. काँग्रेसनेही 'दबाव' या शब्दाचा राजकीय घोषवाक्य म्हणून वापर करण्याऐवजी उपलब्ध पुराव्यांवर बोलले पाहिजे. कारण या संपूर्ण वादाचा अंतिम निर्णय पुस्तक प्रकाशित झाल्यानंतरच होऊ शकतो. वाचकांनीही या वादात आपली भूमिका ठरवताना 'पुस्तक आधी वाचा, नंतर निष्कर्ष काढा' हा साधा नियम लक्षात ठेवायला हवा. सोनिया यांच्या आत्मकथनात मोदींबद्दल काय लिहिले आहे, आरएसएसबद्दल त्यांचे नेमके मत काय आहे, चीनच्या प्रश्नावर त्यांनी कोणते अनुभव मांडले आहेत आणि काँग्रेसच्या अंतर्गत राजकारणाकडे त्या कशा पाहतात, हे पुस्तक समोर आल्यानंतरच स्पष्ट होईल.

## चर्चा आजची

# ऑनलाईन खरेदी आणि खेळांचे धोके

आर्थिक व्यवहार रोखीतच्या जागी जिल्ह्यामध्ये ऑनलाईनवर अधिक भर दिला जात आहे. जीपे, फोन पे व अन्य ॲप द्वारे कॅशलेस पद्धतीने खरेदी केली जात आहे. लॉकडाऊनपासून ऑनलाईन व्यवहाराला सुरुवात झाली. मात्र ऑनलाईन खरेदी करताना प्रत्येकाने काळजी घेणेही गरजेचे आहे. घाईगडबडीत केलेल्या ऑनलाईन खरेदीसह ऑनलाईन खेळांचे धोके वाढण्याची भिती निर्माण झाली आहे. मोबाईलवर वारंवार ऑनलाइन गेमिंग ॲप्सच्या जाहीरातीमधून आकर्षित करून आर्थिक लुट परस्पर होण्याचे धोके आहेत.




**प्रमोद जाधव**

रायगड जिल्ह्यात औद्योगिकीकरणासह पर्यटन वाढत आहे. पर्यटनावर अधारित अनेक व्यवसाय जिल्ह्यामध्ये आहेत. या व्यवसायातून स्थानिकांना रोजगाराची संधी मिळते. जिल्ह्यात वेगवेगळे लहान मोठे उद्योगधंदे असून मोठमोठ्या कंपन्या आहेत. या कंपन्यांसह उद्योगांमधून हजारोंच्या हातांना काम मिळत आहे. यापुर्वी वेतनासह सर्व आर्थिक व्यवहार रोखीत केले जात होते. परंतु बदलत्या आधुनिकतेमुळे जिल्ह्यात सर्व रोखीत व्यवहार कालबाह्य होऊ लागले आहेत. गेल्या काही वर्षांपासून जिल्ह्यात ऑनलाईन व्यवहार वाढत आहे.या व्यवहाराला प्रचंड वेग आला आहे. लॉकडाऊनपासून सुरु झालेल्या ऑनलाईन व्यवहाराला गती मिळत आहे. मोबाईलमध्ये वेगवेगळे नवनवीन ॲप उपलब्ध झाले आहेत. या ॲपमार्फत खरेदी विक्री व्यवहारासह पैशांचे व्यवहारदेखील ऑनलाईन होत आहेत. जिल्हयात ८० टक्केपेक्षा अधिक नागरिक ऑनलाईन व्यवहार करीत आहेत.

पान टपरीपासून वेगवेगळ्या मोठ्या दुकानांमध्ये ऑनलाईन पद्धतीने खरेदीचा व्यवहार चालत आहे. वेगवेगळ्या वस्तू, कपडे खाद्य पदार्थदेखील ऑनलाईन पद्धतीने केले जातात. सध्या जुगार मटका सारखे अवैध धंदे देखील ऑनलाईन खेळले जात आहेत. मोबाईलवर ए.एम. ९९९, मधुर मटका, लकी स्पाईस, तीन पत्ती अशा अनेक प्रकारच्या ऑनलाईन गेमिंग ॲपच्या जाहिराती येत आहेत. वारंवार होणाऱ्या जाहिरातीला प्रवृत्त होऊन जास्तीचे पैसे कमविण्याच्या हेतूने अनेक तरुण व काही मंडळी ऑनलाईन गेमिंगला बळी पडत आहेत. कोणतीही पडताळणी न करता, ॲप डाऊन लोड करून त्या ॲपद्वारे ऑनलाईन खेळ खेळण्यावर अधिक भर दिला जात आहे. मोबाईलवर गेम खेळण्यावर अधिक पैसे भेटत असल्याने ऑनलाईन गेम खेळणाऱ्यांची संख्या अधिक वाढली आहे. तासनतास मोबाईवर मग्न राहून ऑनलाईन गेम खेळला जात आहे.

ऑनलाइन जुगाराचे व्यसन प्रचंड वाढले आहे. त्यामुळे आर्थिक नुकसान, फसवणूक सारखे अनेक धोके आणि परिणाम निर्माण होत आहेत. ही एक गंभीर समस्या निर्माण झाली आहे. त्याचा व्यक्तीच्या आरोग्यावर नातेसंबंधावर आणि कल्याणावर मोठा परिणाम होत आहे.

ऑनलाइन जुगार खेळण्याचे एक महत्त्वाचे धोके आणि परिणाम म्हणजे आर्थिक नुकसान आहे. जिंकण्याच्या आणि अधिक पैसे मिळविण्याच्या उत्साहाने मोठी आर्थिक फसवणूक होत असल्याचे प्रकार समोर आले आहेत. ऑनलाईन गेमिंग आणि जुगाराच्या ॲप्सच्या माध्यमातून लोकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या एका अत्याधुनिक रॅकेटचा पर्दाफाश रायगड पोलीस दलातील सायबर गुन्हे शाखेने केला आहे. तब्बल ४४ म्युल बँक खात्यांमधील तब्बल १९ कोटी ४४ लाखांहून अधिक रक्कम गोठविण्यात आली आहे. मोबाईलवर वारंवार ऑनलाइन गेमिंग ॲप्सची जाहिरात दिसत होती. कायदेशीर असल्याचा भास झाल्याने ९९९, मधुर मटका, ही ॲप्स डाऊनलोड करून त्यात दहा हजार रुपये त्यांनी गुंतवले.मात्र त्यांना कोणताही परतावा न मिळाल्याने फसवणूक झाल्याचे लक्षात आले. त्यानंतर त्यांनी तक्रार दाखल केली. सायबर पोलिसांनी तपासात २५ पेक्षा जास्त ऑनलाईन गेमिंग ॲप्स उघड केले आहेत. सर्व ॲप्स गुगल प्ले स्टोअरवर सहज उपलब्ध असल्याने अनेकांना ते कायदेशीर वाटत होते. मागील काही वर्षांपासून ऑनलाईन फसवणूकीचे अनेक प्रकार समोर आले आहेत. बेकायदेशीर ॲप्समध्ये अडकवून आर्थिक लूट करणारी टोळी सक्रीय झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी ऑनलाईन खरेदी अथवा ऑनलाईन गेमिंग करताना काळजी घेण्याची गरज आहे. सध्या ऑनलाईन खरेदीचा क्रेझ वाढत असताना घरबसल्या वेगवेगळ्या ॲपद्वारे खेळ खेळण्याचा ट्रेंड प्रचंड वाढला आहे. प्ले स्टोअरमधून एखादा गेम डाऊनलोड करून त्यामध्ये पैशांची गुंतवणूक करून अधिक पैसे मिळविण्याची ओढ वाढली आहे. मात्र त्याची, पडताळणी न झाल्यास ऑनलाईन खरेदी आणि खेळांचे धोके वाढण्याचे संकट निर्माण होत आहेत. त्यामुळे नागरिकांनी सतर्कता दाखवत ऑनलाईनवर भर देण्याची गरज आहे. ऑनलाईन खरेदी आणि खेळाचे धोके लक्षात ठेवूनच खेळ आणि खरेदी करावी, असे आवाहन वेगवेगळ्या सुरक्षा यंत्रणेकडून होत आहे.

## लोकसंसद

### गणेश मंडपांत जुगार नकोच!

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या मंडपात रात्री पत्त्यांचे डाव रंगणे आता सामान्य झाले आहे. श्रीच्या मंडपाची राखण करण्यासाठी जागरण करावे लागते आणि त्यासाठी नुसतेच बसण्याऐवजी मंडपात पत्त्यांचे डाव बसवले जातात. त्यावर जुगार खेळला जातो. प्रत्येक डावाला एक ठराविक रक्कम डावात जिंकलेली व्यक्ती 'टीप' म्हणून मंडपातील दान पेटीत टाकते. यामुळे दानपेटीतील अर्पणाची रक्कम वाढत असल्याने मंडळालाही आर्थिक लाभ होतो. काही ठिकाणी तर श्रीच्या मंडपाहुन मोठा मंडप खास जुगार खेळण्याकरिता उभारला जातो. एरव्ही ऑनलाईन जुगार खेळणारी मंडळी या ऑफलाईन जुगारात हिरीरीने सहभागी होतात. अशा ठिकाणी स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांनाही 'मॅनेज' केले जाते. हे सर्व पाहिल्यावर ही जुगार खेळणारी मंडळी गणपतीच्या जागरणासाठी जुगार खेळतात कि जुगार खेळण्यासाठी गणपती आणतात असा प्रश्न पडतो. गणेश मंडपात जागरणच करायचे आहे, तर त्यासाठी अन्य मार्गही आहेत. रात्रीच्या वेळेत जागरणासाठी भजन, नामसंकीर्तन आदी उपक्रम राबवूनही जागरण करता येते त्यासाठी जुगारच का हवा? बऱ्याचदा ही जुगारी मंडळी गुटखा, तंबाखू खाऊन पत्त्यांच्या डावात रंगलेली असतात. यांच्याकडून मंडपाच्या दाराबाहेरच तोंडाच्या पिचकाऱ्या मारल्या जातात. श्रीगणेशाच्या मूर्तीतून प्रक्षेपित होणाऱ्या चैतन्याचा आणि श्री गणेशाच्या अस्तित्वाने भारित झालेल्या सात्विक वातावरणाचा गणेशभक्तांना लाभ होण्यासाठी मंडपात स्वच्छता आणि पावित्र्य राखणे अत्यंत आवश्यक असते. त्याऐवजी अशा प्रकारे जागरणाचे निमित्त करून श्री गणेशाच्या समोरच जुगाराचे डाव मांडणे, मंडपात अस्वच्छता करणे श्री गणेशाला कधीतरी आवडणार आहे का?

**– जगन घाणेकर, घाटकोपर**

## दिनविशेष

# निसर्गकवी ना. धो. महानोर!



मराठी साहित्यातील अनमोल रत्न, निसर्गकवी ना. धो. महानोर यांची आज जयंती. निसर्गकवी ना. धो. महानोर यांचा जन्म १६ सप्टेंबर १९४२ रोजी पळसखेडे येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे आई-वडील शेतमजूर होते. दुसऱ्याच्या शेतात जाऊन ते राबत असत. ना. धो. महानोरांना चार भाऊ व तीन बहिणी होत्या. त्यात ते सर्वांत थोरले होते. त्यांचे प्राथमिक शिक्षण गावातच झाले; मात्र माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी त्यांना शेंदुर्णीच्या शाळेत जावे लागले. शेंदुर्णीची शाळा गावापासून दहा-बारा किलोमीटर अंतरावर होती. दहा-बारा किलोमीटर पायी चालत जाऊन ते शाळेत जात. शाळेत असतानाच त्यांना कवितेची गोडी लागली. शाळेत असतानाच ते कविता करू लागले. लहानपणापासूनच त्यांना शेत, शिवार आणि निसर्ग यांची आवड होती. त्यामुळे ते त्यावरच कविता करत. लहानपणी लागलेली कवितेची गोडी पुढेही कायम राहिली. मॅट्रिक पास झाल्यावर ते जळगावला उच्च शिक्षण घेण्यासाठी गेले. तिथे त्यांनी मुळजी जेठा महाविद्यालयात कला शाखेत प्रवेश घेतला. तिथे त्यांची काव्यप्रतिभा बहरली. त्यांच्यात असलेली काव्यप्रतिभा ओळखून महाविद्यालयातील शिक्षकांनी त्यांना प्रोत्साहन दिले. दुर्दैवाने घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने त्यांना उच्च शिक्षण अर्ध्यावर सोडून घरी परतावे लागले. घरी आल्यावर ते शेतीत रमले. शेतशिवारात राबतच त्यांनी आपल्या कविता करायला सुरुवात केली. शिक्षण थांबले, पण कविता थांबली नाही. ते शेतशिवारात रमून कविता करू लागले. शेतशिवारात रमणाऱ्या या कवीने आपल्या कवितेतून निसर्गाची अमाप उधळण केली. त्यांच्या अद्भुत निसर्गकवितांनी त्यातल्या रंग-गंधांनी, नदीच्या प्रवाहासारख्या नाद-लयींनी वाचक-रसिकांना वेड लावले. रानात राहणाऱ्या ना. धो. महानोर सरांच्या कवितेचे केंद्रस्थान निसर्ग आणि स्त्रिया होते. निसर्ग आणि स्त्रियांना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी केलेल्या कविता वाचकांच्या मनावर कायमच्या कोरल्या गेल्या.

त्यांचे एकूण अकरा काव्यसंग्रह प्रसिद्ध असून 'अजिंठा' नावाचे खंडकाव्यही प्रकाशित झाले आहे. यादरम्यान त्यांनी गद्यलेखनही सुरू ठेवले. 'गांधारी' ही कादंबरी, 'गपसप' व 'गावाकडच्या गोष्टी' हे लोककथासंग्रह, 'यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार', 'शरद पवार आणि मी', 'आनंदयोगी पु. ल.' ही पुस्तके त्यांनी लिहिली. त्यांनी जरी गद्यलेखन विपुल प्रमाणात केले असले, तरी त्यांचे पहिले प्रेम कवितेवरच होते. त्यांनी अनेक चित्रपटांची गाणीही लिहिली आहेत. 'जैत रे जैत' चित्रपटातील त्यांची गाणी तर रसिकांच्या ओठांवर आजही कायम आहेत. ना. धो. महानोर सर सहा वर्षे विधानपरिषदेचे सदस्य होते. या काळात त्यांनी सभागृहात शेती आणि ग्रामीण भागातील प्रश्न पोटतिडकीने मांडले आणि ते सोडवण्याचा प्रयत्न केला. महानोर सरांना अनेक पुरस्कार मिळाले. अगदी पद्मश्रीदेखील मिळाली; मात्र 'निसर्गकवी' ही रसिकांनी, वाचकांनी त्यांना दिलेली उपाधी ते सर्व पुरस्कारांपेक्षा श्रेष्ठ मानत. ३ ऑगस्ट २०२३ रोजी निसर्गात रमणारा हा निसर्गकवी सर्वांना सोडून गेला. ना. धो. महानोर सर जरी कायमचे निघून गेले असले, तरी रसिकांच्या आणि वाचकांच्या मनात ते कायम निसर्गकवी म्हणूनच स्मरणात राहतील. त्यांच्या निधनाने मराठी साहित्याची मोठी हानी झाली आहे. निसर्गकवी ना. धो. महानोर यांनी आपल्या कवितेतून मराठी साहित्याला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. निसर्गकवी ना. धो. महानोर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

**आजचे अन्नदाते**

**स्व. प्रकाश वसंत गोडबोले, जयंती निमित्त, अलिबाग**



**कै. हेमंत ( मुन्ना) प्रभाकर घरत, प्रथम पुण्यतिथी, अलिबाग**

## मधुकर यादव यांचे निधन

**महाड :** महाराष्ट्र शासनाचा अत्यंत मानाचा 'कोकण कलारत्न' पुरस्कारप्राप्त, गुरुगणपती घराण्याचे निष्णात वस्ताद तसेच कलगी-तुरा व तमाशा क्षेत्रातील शाहीर, कवी आणि लेखक मधुकर (बुवा) हरिचंद्र यादव (४८) यांचे सोमवारी (दि.१४) निधन झाले. कलगी-तुरा आणि तमाशा क्षेत्रात एक सिद्धहस्त कवी, गीतकार व लेखक म्हणून त्यांनी रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. लोककलेतील या उत्तुंग योगदानाची दखल घेऊनच महाराष्ट्र शासनाने त्यांना कोकण कलारत्न या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित केले होते. त्यांनी सामाजिक आणि संघटन क्षेत्रातही मोलाचे कार्य केले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुली, पुतणे आणि मोठा आप्तपरिवार आहे.



# हेटवणे जलवाहिनीवर पाण्याचा 'हिशेब'

**प्रवाह मोजणी, नियंत्रणासाठी अत्याधुनिक यंत्रणा**

**| पनवेल | विशेष प्रतिनिधी |**

**नवी मुंबई परिसरातील वाढत्या पाणी मागणीच्या पार्श्वभूमीवर सिडकोने पाणी वितरण व्यवस्था अधिक अचूक करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. गव्हाणफाटा-वहाळ येथील १,५०० मिमी व्यासाच्या हेटवणे जलवाहिनीवर प्रवाह मोजणी व नियंत्रण यंत्रणा उभारण्यासाठी सिडकोने ५७ लाख ८५ हजार रुपयांची निविदा काढली आहे. वहाळ एमबीआर ते खारघर सेक्टर-२६ एमबीआरदरम्यानच्या या महत्त्वाच्या जलवाहिनीवर ही यंत्रणा बसविण्यात येणार आहे.**




या कामामध्ये प्रवाह मोजणी यंत्रणा, फ्लो मीटर तसेच बटरफ्लाय व्हॉल्व्हसह प्रवाह नियंत्रण व्यवस्था उभारली जाणार आहे. त्यामुळे या मुख्य जलवाहिनीतून प्रत्यक्ष किती पाणी वाहत आहे, त्याचा प्रवाह कसा नियंत्रित केला जात आहे आणि पुढील जलसाठवण केंद्रापर्यंत किती पाणी पोहोचत आहे, याचा अधिक अचूक मागोवा घेणे शक्य होणार आहे.

सिडकोच्या पाणीपुरवठा व्यवस्थेत मोठ्या व्यासाच्या जलवाहिन्यांना विशेष महत्त्व आहे. त्यामुळे जलवाहिनीवरील प्रवाहाचे अचूक मोजमाप उपलब्ध झाल्यास पाणी वितरणाचे नियोजन अधिक शास्त्रीय पद्धतीने करता येणार आहे. पाण्याची मागणी वाढत असताना उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन आणि वितरण करण्यासाठी अशा प्रकारची प्रवाह नियंत्रण व्यवस्था महत्त्वाची ठरणार आहे.

सिडकोने या कामासाठी ७ सप्टेंबर २०२६ रोजी निविदा प्रसिद्ध केली असून १५ सप्टेंबर ही निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आहे. तांत्रिक बोली १७ सप्टेंबर रोजी उघडण्याचे नियोजन असून कामाची अंदाजित किंमत ५७.८५ लाख रुपये आहे.

### पाणीपुरवठ्याचे नियोजन करणे सोपे

नवीन यंत्रणेमुळे जलवाहिनीतून सोडण्यात येणाऱ्या पाण्याचे प्रमाण आणि प्रत्यक्ष प्रवाह याबाबत अधिक अचूक माहिती उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे पाणी वितरण व्यवस्थेतील तफावत शोधणे, आवश्यकतेनुसार प्रवाह नियंत्रित करणे आणि भविष्यातील पाणीपुरवठ्याचे नियोजन करणे सिडकोला सोपे होऊ शकते. दरम्यान, या कामाचा थेट उद्देश कळंबोली किंवा खारघरला अतिरिक्त पाणीपुरवठा करणे असा निविदेत नमूद नाही. मात्र, वहाळ ते खारघर सेक्टर-२६ या महत्त्वाच्या जलवाहिनीवरील प्रवाहाचे मोजमाप आणि नियंत्रण अधिक अचूक झाल्याने संबंधित पाणी वितरण व्यवस्थापनाला त्याचा फायदा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या यंत्रणेनंतर प्रत्यक्ष पाणी वितरणात काय सुधारणा होते, याकडे आता लक्ष लागले आहे.

## बाप्पाच्या आगमनानंतर पालिकेला जाग

**खड्डे भरायला सुरूवात**

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

गणेशोत्सव सुरू होऊन बाप्पाचे आगमन झाले, मात्र पनवेल शहरातील रस्त्यांवरील खड्डे कायम राहिल्याने 'खड्डे भरण्यात पालिकेला उशीर झाला की काय?' असा सवाल गणेशभक्तांकडून उपस्थित केला जात आहे. पावसाची वेळ आणि खड्डे बुजविण्याची वेळ यांचा मेळच बसला नसल्याचे चित्र शहरात दिसून येत आहे.



गणेश चतुर्थीच्या दिवशी सोमवारी मुसळधार पावसातही अनेक गणेशभक्तांनी ढोल-ताशांच्या गजरात आणि वाजतगाजत आपल्या लाडक्या बाप्पाला घरी आणले. मात्र याचवेळी गणेशमूर्ती घेऊन जाणाऱ्या वाहनांना रस्त्यावरील खड्ड्यांचा सामना करावा लागला.

दरम्यान, मंगळवारी (दि.१५) पनवेल महानगरपालिका प्रशासनाने रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याच्या कामाला सुरुवात केली आहे. त्यामुळे दीड दिवसाच्या गणपतीच्या विसर्जनासाठी गणेशभक्त पुन्हा याच रस्त्यांचा वापर करणार असताना काही ठिकाणी रस्ते खड्डेमुक्त झाल्याचे, तर काही ठिकाणी अजूनही खड्डे कायम असल्याचे चित्र आहे.

खड्डे बुजविण्यासाठी पालिकेकडून वापरण्यात येणारे साहित्य पावसात किती दिवस टिकणार, असा प्रश्नही पनवेलकरांकडून उपस्थित केला जात आहे. पावसामुळे पुन्हा खड्डे निर्माण झाल्यास केलेली डागडुजी केवळ तात्पुरती ठरण्याची शक्यता आहे. गणेशोत्सवाच्या काळात शहरातील रस्त्यांवर नागरिकांची आणि वाहनांची मोठी वर्दळ असते. त्यातच गणेशमूर्ती घेऊन जाणारी वाहने, मिरवणुका आणि विसर्जनासाठी जाणाऱ्या गणेशभक्तांची संख्या वाढते. त्यामुळे रस्ते खड्डेमुक्त असणे अत्यावश्यक आहे. 'बाप्पा घरी आले, आता रस्ते तरी सुरक्षित करा,' अशी अपेक्षा गणेशभक्तांकडून व्यक्त होत आहे. पालिकेने केवळ खड्डे बुजविण्यापुरती कारवाई न करता दर्जेदार साहित्याचा वापर करून कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी पनवेलकरांनी केली आहे.

## बेस्ट बसची कारला धडक

**मुंबई :** गोरेगाव पूर्वमध्ये सोमवारी (दि.१४) सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास बेस्टच्या ताफ्यातील मातेश्वरी ही कंत्राटी दिंडोशी आगारातून बस भाईंदरच्या दिशेने चालली होती. यादरम्यान ओबेरॉ मॉलसमोरील सिग्नलजवळ बस उड्डाणपुलाखाली वळण घेत असताना बसने कारला धडक दिली आणि बस मेट्रोच्या खांबावर आदळली. या अपघातात दोन जण जखमी झाले. जखमींना तात्काळ उपचारासाठी जोगेश्वरी येथील ट्रॉमा केअर रुग्णालयात नेण्यात आले. राजेंद्र मुरलीधर सोनावणे आणि मंगेश रामचंद्र मोडलेकर अशी अपघातातील जखमींची नावे आहेत.

## विद्यार्थ्यांना करिअरविषयी मार्गदर्शन

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

तंत्रज्ञानाच्या झपाट्याने बदलणाऱ्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि अंतराळ विज्ञानाचे वाढते महत्त्व लक्षात घेऊन पिल्लई कॉलेज, रसायनी यांच्या वतीने सर एस. ए. हायस्कूल व स्व. म.ल. दांडेकर कनिष्ठ महाविद्यालय, मुरूड-जंजिरा येथे बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय सेमिनार आयोजित करण्यात आला.


(छायाचित्र : गणेश चोडणेकर)

'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उपग्रह प्रतिकृती निर्मिती' या विषयावर आयोजित या सेमिनारचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना व अंतराळ तंत्रज्ञान क्षेत्रातील विविध करिअरच्या संधींची माहिती देणे तसेच भविष्यातील रोजगार व शिक्षणाच्या वाटांबाबत मार्गदर्शन करणे हा होता.

कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक पिल्लई कॉलेजचे आयुष बाबरे आणि त्यांच्या सहकारी चमूने विद्यार्थ्यांना तसेच उपग्रह तंत्रज्ञानाच्या मूलभूत संकल्पना सोप्या पद्धतीने समजावून सांगितल्या. विशेष म्हणजे, केवळ सैद्धांतिक माहिती न देता विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष उपग्रह प्रतिकृती तयार करून घेण्यात आल्या. या प्रात्यक्षिकामुळे विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला.

## उदय खोत यांना बंधूशोक

**| कोर्लई | प्रतिनिधी |**

मुरुड तालुक्यातील नांदगावचे रायगड भूषण, कुलाबा जीवनगौरव व अन्य अनेक पुरस्कार प्राप्त पत्रकार उदय खोत यांचे ज्येष्ठ बंधू अजित मधुसूदन खोत (७२) यांचे शुक्रवारी (दि.११) हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक विवाहित मुलगा, एक विवाहित कन्या, सून, जावई, नात, आई, तीन बंधू व तीन भगिनी असा मोठा परिवार आहे. तीन ते चार महिन्यांपूर्वी त्यांच्या हृदयावर शस्त्रक्रिया करण्यात आली होती. ते मुंबईतील एका खाजगी ट्रान्सपोर्ट कंपनीमध्ये ते काम करीत होते. त्यांचे दशक्रिया विधी नांदगावच्या अमृतेश्वर मंदिर (श्री शंकर मंदिर) नजिकच्या स्मशानभूमीत रविवार दि.२० सप्टेंबर रोजी सकाळी नऊ वाजता करण्यात येणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांनी दिली.



## गणपती आगमनाला पावसाची हजेरी

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुरूड शहरात सोमवारी (दि.१४) गणपती बाप्पांच्या आगमनाचा उत्साह पाहायला मिळाला. सकाळपासूनच शहरातील विविध भागांत गणरायाच्या स्वागतासाठी नागरिकांची लगबग सुरू होती. दरम्यान, गणपती आगमनाच्या वेळी पावसानेही हजेरी लावल्याने वातावरणात भक्तिमय उत्साहासोबतच आल्हाददायक गारवा निर्माण झाला.

गणरायाच्या स्वागतासाठी घराघरांत आकर्षक सजावट करण्यात आली होती. पारंपरिक पद्धतीने गणपतीची मिरवणूक काढत नागरिकांनी बाप्पांना घरी आणले. ढोल-ताशांचा गजर, 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने शहरातील वातावरण दुमदुमून गेले.

गणरायाला फुलांची आकर्षक सजावट, आरास आणि नैवेद्य अर्पण करून भक्तिभावाने पूजा करण्यात आली. यंदाच्या गणेशोत्सवासाठी नागरिकांमध्ये मोठा उत्साह असून पुढील काही दिवस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

पावसाची हजेरी असूनही गणरायाच्या स्वागतासाठी नागरिकांचा उत्साह मात्र तसूभरही कमी झालेला दिसून आला नाही.

## कर्मचाऱ्यांच्या कामगिरीला कौतुकाची शाबासकी

**खांदेश्वर पोलीस ठाण्यात 'कॉप ऑफ द मंथ' उपक्रम**

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात पोलीस कर्मचाऱ्यांच्या उल्लेखनीय कामगिरीला प्रोत्साहन देण्यासाठी राबविण्यात येणारा 'कॉप ऑफ द मंथ' हा उपक्रम आता नागरिकांचेही लक्ष वेधून घेत आहे. खांदेश्वर पोलीस ठाण्यात प्रवेश करताच लावण्यात आलेल्या आकर्षक फ्रेममधून महिन्याची उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांची माहिती नागरिकांना पाहायला मिळत आहे.




पोलीस ठाण्यातील भिंतीवर लावण्यात आलेल्या या फ्रेममध्ये संबंधित कर्मचाऱ्यांचे छायाचित्र, नाव, पद तसेच त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे पोलिसांच्या दैनंदिन कामकाजातील चांगल्या कामाची थेट दखल घेतली जात असल्याचे चित्र दिसत आहे.

खांदेश्वर पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदार नितीन वाघमारे आणि पोलीस हवालदार वैभव शिंदे यांची 'कॉप ऑफ द मंथ' म्हणून निवड करण्यात आली आहे. गुन्ह्यांच्या तपासात तांत्रिक साधनांचा प्रभावी वापर करून आरोपींचा शोध घेण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. सीडीआर तसेच डम्प डेटा यांच्या माध्यमातून तांत्रिक तपास करत आरोपींचा माग काढण्यात आला. या तपासामुळे आरोपींचा शोध घेऊन त्यांना अटक करण्यात यश आले. पोलीस कर्मचाऱ्यांच्या कामगिरीचे अशा पद्धतीने सार्वजनिक कौतुक केल्याने इतर कर्मचाऱ्यांनाही उत्कृष्ट काम करण्यासाठी प्रेरणा मिळण्याची शक्यता आहे. तसेच पोलीस ठाण्यात येणाऱ्या नागरिकांना पोलिसांच्या कामाची आणि तपासातील आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराची माहिती मिळत आहे.

पोलिसांच्या चांगल्या कामाची दखल आणि कर्मचाऱ्यांचा सन्मान यामुळे नागरिकांमध्ये पोलीस दलाविषयीचा विश्वास अधिक दृढ होण्यास मदत होत आहे.

**कापडी पिशव्यांसह संदर्भ ग्रंथांचे वाटप | पर्यावरणपूरक जीवनशैलीबाबत मार्गदर्शन**

# प्लास्टिक बंदीसह डिजिटल व्यसनाविरोधात जनजागृती

**| रसायनी | प्रतिनिधी |**

**पर्यावरण संवर्धन, प्लास्टिकमुक्त समाजनिर्मिती तसेच विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल साधनांच्या योग्य व मर्यादित वापराबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट आणि पिल्लई महाविद्यालय, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, रसायनी-मोहापाडा यांच्या संयुक्त विद्यमाने मोहापाडा येथे विविध जनजागृतीपर उपक्रम उत्साहात राबविण्यात आले.**




जिल्हा परिषद केंद्र शाळा, मोहापाडा येथे विद्यार्थ्यांना प्लास्टिकच्या अतिवापरामुळे पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम, प्लास्टिक बंदीचे महत्त्व तसेच पर्यावरणपूरक जीवनशैली याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. त्याचबरोबर टीव्ही, इंटरनेट आणि मोबाईलच्या अतिवापरामुळे होणारे शारीरिक, मानसिक, सामाजिक व शैक्षणिक दुष्परिणाम विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. डिजिटल साधनांचा योग्य, सुरक्षित आणि मर्यादित वापर करण्याचे आवाहन करण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि पर्यावरण तसेच डिजिटल माध्यमांच्या योग्य वापराबाबत अधिक माहिती मिळावी, या उद्देशाने संदर्भ ग्रंथांचे वाटप करण्यात आले. तसेच प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळून पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारण्यासाठी विद्यार्थ्यांना कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

यानंतर मोहापाडा बाजारपेठेत प्लास्टिक बंदीबाबत जनजागृती अभियान राबविण्यात आले. दुकानदार, व्यापारी आणि नागरिकांना प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळून कापडी पिशव्यांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी नागरिक व दुकानदारांना कापडी पिशव्यांचे वाटप करून ''प्लास्टिक पिशवी नको, कापडी पिशवी वापरा'' हा पर्यावरणपूरक संदेश देण्यात आला.

दरम्यान, विद्यार्थ्यांनी मोहापाडा बाजारपेठेतून जनजागृती रॅली काढून पर्यावरण संवर्धन आणि डिजिटल व्यसनाविरोधात घोषणाबाजी केली. 'प्लास्टिकला नकार कापडी पिशवीचा स्वीकार!', 'मोबाईलचा योग्य वापर करा डिजिटल व्यसनापासून दूर राहा!', 'स्वच्छ पर्यावरण, निरोगी समाज आणि जबाबदार डिजिटल वापर हीच काळाची गरज!' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. पर्यावरणाचे रक्षण ही केवळ शासनाची किंवा एखाद्या संस्थेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. प्लास्टिकमुक्त व पर्यावरणपूरक मोहापाडा घडविण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

## निवडक

### शर्मिला गावंड यांना पुरस्कार



**उरण :** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला केंद्रस्थानी ठेवून सातत्याने नाविन्यपूर्ण, कृतीआधारित व विद्यार्थीकेंद्रित शैक्षणिक उपक्रम राबविणाऱ्या शर्मिला महेंद्र गावंड यांना रायगड जिल्हा परिषदेचा सन २०२६-२७ चा 'शिवभूमी आदर्श शिक्षक पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. त्यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक कार्याची जिल्हास्तरावर झालेली ही दखल शिक्षण क्षेत्रासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. रायगड जिल्हा परिषदेचा मानाचा शिवभूमी आदर्श शिक्षक पुरस्कार महाड येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रीय स्मारक पवित्र वास्तूमध्ये पार पडला. राजिप प्राथमिक शाळा, नवीन शेवे, ता. उरण, रायगड येथे कार्यरत असलेल्या गावंड यांनी पारंपरिक अध्यापन पद्धतीला नाविन्याची जोड देत विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी केली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत गेल्या तीन वर्षांत त्यांना विविध शैक्षणिक व सामाजिक संस्थांकडून २५ हून अधिक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.



### रुपाली पाटील पुरस्काराने सन्मानित

**रसायनी :** गुळसुंदे गावच्या रहिवासी तसेच राजिप प्राथमिक शाळा, मोहोपाडा येथे कार्यरत असलेल्या विषय शिक्षिका रुपाली अनिल पाटील यांना सन २०२६ चा मानाचा 'रायगड जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात आला. महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकात आयोजित दिमाखदार सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला. या पुरस्कार सोहळ्यास रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री भरत गोगावले, रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जिल्हा परिषद शिक्षण सभापती कळंबे, विधान परिषद सदस्य अनिकेत तटकरे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले तसेच जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) संजय नाईकडे यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. रुपाली पाटील यांनी शिक्षण क्षेत्रातील आपल्या २१ वर्षांच्या यशस्वी सेवेत विविध उपक्रमांच्या माध्यमातून उल्लेखनीय कार्य केले आहे. आंतरराष्ट्रीय, राज्य व जिल्हास्तरीय शोधनिबंध सादरीकरण तसेच व्हिडिओ निर्मिती स्पर्धांमध्ये त्यांनी यश संपादन केले आहे. 'दीक्षा ॲप' आणि व्हर्च्युअल क्लाससाठी ई-कंटेंट निर्मिती करून त्यांनी अध्यापनामध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला. शिक्षण क्षेत्रातील सातत्यपूर्ण योगदान, डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हा मानाचा पुरस्कार मिळाला. याबद्दल त्यांचे गुळसुंदे व मोहोपाडा परिसराच्या शैक्षणिक क्षेत्रातून कौतुक होत आहे.




### अनोख्या पद्धतीने वाढदिवस साजरा

**पाली/बेणसे :** वाढदिवसाचा अवाजवी खर्च टाळून सामाजिक दायित्व जपण्याचा एक अनोखा वस्तूपाठ प्रसाद लक्ष्मण गायकवाड यांनी घालून दिला आहे. शुक्रवारी (दि.११) आपल्या ४६व्या वाढदिवसाचे औचित्य साधून त्यांनी मायेचा हात सोशल फाऊंडेशनच्या मुलांसोबत हा विशेष दिवस साजरा करत बालकांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलवले. प्रसाद गायकवाड यांनी आपल्या पत्नी कर्जतच्या उपकृषी अधिकारी अर्चना गायकवाड आणि मुलगा वेदांत गायकवाड यांच्यासह संस्थेला प्रत्यक्ष भेट दिली. याप्रसंगी संस्थेतील मुलींनी त्यांचे पारंपरिक पद्धतीने औक्षण करून त्यांना उदंड आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या. वाढदिवसाचा केक न कापता मुलांच्या प्रत्यक्ष गरजेला आणि आनंदाला प्राधान्य देण्याचा निर्णय गायकवाड यांनी घेतला. त्यांनी संस्थेतील १९ मुलांसाठी 'सुपर बॉलिंग ट्रॅक सूट अप्पर' भेट दिले, तसेच सर्व मुलांना सफरचंदांचे वाटप केले. यावेळी गायकवाड परिवाराने मुलांशी अत्यंत आपुलकीने संवाद साधत त्यांच्याशी हितगुज केले आणि संस्थेच्या विविध सामाजिक उपक्रमांची सविस्तर माहिती घेतली. यापुढेही मायेचा हात सोशल फाऊंडेशनच्या कार्याशी सतत जोडलेले राहू, असा निर्धार प्रकाश गायकवाड यांनी यावेळी व्यक्त केला.

### गणेशोत्सवानिमित्त विविध कार्यक्रम

**रोहा :** 'एक गाव, एक गणेशोत्सव' या संकल्पनेतून रोहाचा सार्वजनिक गणेशोत्सव यंदा १०५ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. यानिमित्त १४ ते २५ सप्टेंबरदरम्यान विविध धार्मिक, सांस्कृतिक, मनोरंजनात्मक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती अध्यक्ष अमेय जोशी यांनी दिली. यंदा उत्सव समितीच्या वतीने मनोरंजनाबरोबरच लोकप्रबोधन व स्थानिक कलाकारांना व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. कार्यक्रमामध्ये नावीन्य आणण्यासोबतच जुन्या परंपरा व नव्या सुधारणा यांचा सुयोग्य संगम उत्सव समितीने साधले आहे. या कालावधीत श्रींचे आगमन, भजन, श्लोक पठण व चित्रकला स्पर्धा, स्थानिक कलाकारांचे कलागुण दर्शन, रक्तदान शिबिर, सत्यनारायण महापूजा, हळदी-कुंकू, जादूचे प्रयोग, कीर्तन, गीतरामायण, व्याख्यान, बालनाट्य, कॅरम-बुद्धिबळ, शरीरसौष्ठव व पाककला स्पर्धा तसेच सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. २५ सप्टेंबर रोजी श्रींची भव्य मिरवणूक व विसर्जनाने उत्सवाची सांगता होईल.



## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करूनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

\- मुख्य संपादक

## जाहीर सूचना

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशील श्री. दीपक रामजीत यादव, रा. शिवशक्ती नगर, सारमाई मंदिराजवळ, तुर्भे, नवी मुंबई, ठाणे ४००७०५ यांनी खालील वर्णनाच्या शेतजमीन मिळकत १) योजना प्रदीप दिघे, २) प्रदीप चंद्रकांत दिघे, दोघेही रा. सी - २२, सालस सोसायटी, रामबाग लेन नं. ४, जनता सहकारी बँक कल्याण (पश्चिम), कल्याण, जि. ठाणे पिन-४२१३०१ यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे - अंजप, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रुपये-पैसे |
|---|---|---|---|
| ४३ | १४ | ०-४४-०० पो.ख.०-०१-०० एकूण ०-४५-०० | ०-५५ |

वरील शेतजमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, दान, भाडेपट्टा, लिज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सूचना आहे.

दिनांक : १७ सप्टेंबर २०२६

**ॲडव्होकेट प्रवीण पुंडलिक कराळे**
पत्ता : ओमकार अपार्टमेंट, डिकसळ,
पो. कोषाणे, ता. कर्जत, जि. रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत विद्यमान मालकाकडून कायम खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदरहू मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| जमिन मालकाचे नाव | गावाचे नाव | स.नं/ हि.नं | क्षेत्रफळ हे आर प्रति | आकार रु.पै |
|---|---|---|---|---|
| अरुणा विलास सावंत<br>विलास बबन सावंत | नागेवाडी ता.कर्जत | ५०/७ | ००-७७-००<br>००-०७-००<br>एकूण ००-८४-०० | ० रू ७३ |

सदरहू वर नमूद केलेली शेती मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांचे मालकीची स्वकष्टाची व ताबे कब्जा वहीवाटीची आहे असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ उताऱ्यावरून तसेच दिसते. सदर शेती मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी तदंगभूत सर्व हक्कांगासह कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर शेती मिळकतीत कोणाचा काही गहाण, दान, साठेकरार, बक्षिस, फरोक्तखत, लिज वगैरे प्रकारचा हक्क वा कुळ हक्क, अन्न वस्त्र बोजा असल्यास त्याने तसे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाचे आत खालील पत्त्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मागाहून येणारी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

ता. १५/०९/२०२६

सही/-
**ॲड. सतीश अर्जुन शेळके**
(बी.ए.एल.एल.बी) मुंबई हायकोर्ट
ऑफीस पत्ता- नारायण देशमुख
हाऊस दगडे आळी कर्जत पूर्व
कर्जत- रायगड मो.नं ९८८११३२२४८

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या बिनशेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स. नं./हि. नं. | एकुण क्षेत्र चौ.मी. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|---|
| सौ. मंजु अजय कुमार व इतर ५ | ४७१/३३ | २४५-०० | २४-५० |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, ॲटॅचमेंट, लिन, मृत्युपत्र, पोटगी, अदलाबदल वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. १६/०९/२०२६

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे**
पत्ता - बी-३०१, सायली निर्माण, निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. यशवंत दशरथ हुदार व श्री. संस्कार यशवंत हुदार, दोघे रा. फ्लॅट नं. १२०५ ए, साई अर्चना को. ऑ.हौ.सो., प्लॉट नं. १८, सेक्टर २५, जे.एन.पी.टी. सर्विस रस्त्याजवळ, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड, ४१०२०६, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे मांडवणे, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत**

| स.नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| १५४/२ | ३.६८.०० | २.५६ |

यापैकी श्रीमती आशा अशोक भालेकर व श्री. मितेश अशोक भालेकर यांच्या नावे असलेले ०.४५.०० हे.आर.पॉ.क्षेत्र.

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या ०७ (सात) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- १६/०९/२०२६

सही/-
**ॲड. उषा जे. कांबळे**
कर्जत, 'पुष्प विमल' निवास, नानामास्तर
नगर, मुद्रे. मो.नं. ७३८५००४८०६

## जाहीर सुचना

सर्व संबधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे गुंजीस, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली बिनशेती भुखंड जमिन मिळकत श्री. नरेंद्र वामनराव मुनीश्वर, राहणार- ऐरोली, नवीमुंबई यांच्या खुद्द मालकी हक्काची असून, सदरील बिनशेती जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदर बिनशेती जमिन मिळकत, पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. नरेंद्र वामनराव मुनीश्वर, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, त्यांचे मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ (आठ) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची लेखी हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे, असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा नियोजित खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| गुंजीस, ता. अलिबाग. | ३४/१/८/ब/३ | ७-७०-०० एकूण | ७७-०० |

अलिबाग,
दिनांक : १५/०९/२०२६

सही/-
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी, अे विंग, टिळक रोड
अलिबाग- रायगड.
खरेदीदारांचे वकील

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे बोरगांव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालक १ सज्जाद अकबर खान व २ अनदलीब सज्जाद खान यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

**मौजे बोरगांव, ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१ येथील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे–**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ७३ | ४अ | १-१०-०० हे.आर पैकी विकत देणार यांचे मालकीचे ०-२२-०० हे. आर | ०-८७ |

सबब सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, लिज, लिन, बक्षीस, करार, ताबेकब्जा, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि.१६/०९/२०२६

**ॲड. सतीश धर्मा डायरे**
पत्ता- ००२, शिवतीर्थ, सहयोग
को.ऑ.हौ.सो.ब्राम्हण आळी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.९८५०४०२६५७

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे वडवली, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकती, त्या मिळकतीचे विद्यमान मालक मे. सिफोर्ट कॅसल रिसॉर्ट एल.एल.पी. तर्फे श्री.राजेंद्र वसंत डंडाळे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे व रितसर साठेकरार त्यांनी आमचे अशिलांबरोबर स्वाक्षरीत केलेला आहे.

**परिशिष्ठ**
**मौजे वडवली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| गट क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पैसे |
|---|---|---|
| ४५ | ३-६९-६०<br>पो.ख.०-२०-९०<br>एकूण ३-९०-५०<br>पैकी ३ हे. ५०.५० आर<br>एवढी मिळकत | ६.६९ |
| ५९ | १-१२-००<br>पो.ख.०-२०-००<br>एकूण १-३२-०० | ४.१० |

सदरच्या मिळकती या त्यांचे निर्वेध मालकी हक्कांच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व त्यांचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : १६/९/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हौ.सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :**
**मौजे किरवली, ता. कर्जत जि. रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १) अदिती अनिकेत फक्के<br>२) अनिकेत शरद फक्के | ७१ | १३ | ३-२५-१५ | ३२ | ५२ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता:- ए विंग, फ्लॅट नं. ४,
पहिला मजला, गणेशा अर्पाटमेंट,
कर्जत नगरपालिका कार्यालय शेजारी,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही /-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- १६/०९/२०२६
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :**
**मौजे देऊळवाडी, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| ताहिर एम.यासीन मधु | ८३ | ३४/ब | ०-३२-०० | ० | १७ |
| | सदरील मिळकतीपैकी लिहून देणार यांचे मालकीचे अविभक्त सामाईक मालकीचे हे आर.चौमी ०-१६-०० इतके क्षेत्र | | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता:- ए विंग, फ्लॅट नं. ४,
पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट,
कर्जत नगरपालिका कार्यालय शेजारी,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही /-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- १६/०९/२०२६
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com



## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- Vacancy in furniture Workshop office Education - Graduation Experience - 2 years Location - Bamansure, chondhi Contact - 9823585321
- फर्निचर शोरूममध्ये सेल्स गर्ल/बॉय पाहिजे ठिकाण-झिराड, पात्रता -MBA अनुभव -३-४ वर्षे सेल्सचा अनुभव, पगार-२५००० महिना Contact- 9823585321
- जन्नावार हॉस्पीटल चेंढरे अलिबाग मध्ये कामासाठी मावशी स्टाफ नर्स साठी जागा आहे. संपर्क - ७७९८० ३४५०९
- प्रल्हाद इलेक्ट्रीकल्स - घरगुती इलेक्ट्रीक वस्तु घरी येऊन किंवा घरून घेऊन जाऊन चेक अथवा दुरूस्त केल्या जातील. ७०६६१३८३६८/७३७८४८०१५१
- TANNA FINSERV शॉप नं. १, शारदा CHS, महावीर चौक, बेल्जियन वॅफल समोर, अलिबाग, जि. रायगड, ऑफिस स्टाफची आवश्यकता, शेअर मार्केटसाठी Bolt Operator आवश्यक, Tanna Finserv मध्ये करिअरची उत्तम संधी! संपर्क: ९९२३७५०५४९/९१०५७१७०३८. इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा. अनुभवी व नवोदित उमेदवारांचे स्वागत आहे.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५


## माणगांव नगरपंचायत, माणगांव

ता. माणगांव, जि. रायगड, पिनकोड - ४०२१०४ Email- nagarapanchayatmangaon@gmail.com दु.क्र.०२१४०२६३०५६

जा.क्र./मानपं/जा.नि./२४४६/२०२६-२०२७ दिनांक १५/०९/२०२६

### जाहीर निविदा क्र. १/ दरपत्रक सुचना

निम्ननिर्देशित कामाकरीता इच्छुक मुख्याधिकारी, माणगांव नगरपंचायत, हे निम्ननिर्देशित खालील कामांकरीता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत, अनुभवी व इच्छुक ठेकेदारांकडून दरपत्रक पद्धतीने निविदा मागविणेंत येत आहे.

| अ. क्र | कामाचे नांव | कालावधी | इसारा रक्कम | निविदा फार्म फी |
|---|---|---|---|---|
| १ | नगरपंचायतीस कार्यालयीन स्टेशनरी साहित्य पुरवठा करणे. | दि. १६/९/२०२६ ते दि.२२/०९/२०२६ | २०००/- | ५००/- |
| २ | नगरपंचायतीस फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींग सेवा पुरविणे. | दि. १६/९/२०२६ ते दि.२२/०९/२०२६ | २०००/- | ५००/- |
| ३ | नगरपंचायतीस संगणक स्टेशनरी साहित्य पुरवठा करणे. | दि. १६/९/२०२६ ते दि.२२/०९/२०२६ | २०००/- | ५००/- |
| ४ | नगरपंचायतीस संगणक हार्डवेअर व लायसेन्स सॉफ्टवेअर साहित्य पुरवठा करणे. | दि. १६/९/२०२६ ते दि.२२/०९/२०२६ | २०००/- | ५००/- |
| ५ | नगर पंचायतीस विविध उत्सव/समारंभाकरीता हार, गुच्छे, बुके, गुलाबाची फुले पुरविणे | दि. १६/९/२०२६ ते दि.२२/०९/२०२६ | २०००/- | ५००/- |
| ६ | नगरपंचायतीस विविध सभा/कार्यक्रमा करिता मंडप, स्पीकर, स्टेज इत्यादी पुरवठा करणे. | दि.१६/९/२०२६ ते दि. २२/०९/२०२६ | २०००/- | ५००/- |
| ७ | नगरपंचायतीचे विविध विभागांकरीता बॅनर फ्लेक्स पुरवठा करणे. | दि.१६/९/२०२६ ते दि. २२/०९/२०२६ | ५०००/- | ५००/- |
| ८ | नगर पंचायतीस छापील स्टेशनरी साहित्याचा पुरवठा करणे | दि.१६/९/२०२६ ते दि.२२/०९/२०२६ | ५०००/- | ५००/- |
| ९ | माणगांव नगरपंचायतीचे जलशुद्धीकरण केंद्र व पंप हाऊस येथील पंपाची देखभाल व दुरूस्ती करणे. | दि. १६/९/२०२६ ते दि. २२/०९/२०२६ | ५०००/- | ५००/- |
| १० | माणगांव नगर पंचायतीच्या पाणीपुरवठा विभागाकरीता आवश्यक साहित्य पुरवठा करणे. | दि. १६/९/२०२६ ते दि. २२/०९/२०२६ | ५०००/- | ५००/- |
| ११ | माणगांव नगर पंचायतीचे विविध विभागासाठी जेसीबी, क्रेन, पोकलेन, ट्रक, डंपर, ट्रॅक्टर इत्यादी वाहन व यंत्रसामुग्री पुरवठा करणे. | दि. १६/९/२०२६ ते दि. २२/०९/२०२६ | ५०००/- | ५००/- |
| १२ | माणगांव नगरपंचायत हद्दीमध्ये ग्रीट पुरवठा करणे व पसरवून देणे. | दि. १६/९/२०२६ ते दि. २२/०९/२०२६ | ५०००/- | ५००/- |
| १३ | माणगांव नगर पंचायतीस न्यायालयीन कामाकरीता कायदेशीर सल्लागार नेमणे. | दि. १६/९/२०२६ ते दि. २२/०९/२०२६ | ५०००/- | ५००/- |
| १४ | नगर पंचायतीस विविध उत्सव/समारंभाकरीता व सभेकरीता चहा व नाष्टा पुरवठा करणे | दि. १६/९/२०२६ ते दि. २२/०९/२०२६ | ५०००/- | ५००/- |
| १५ | माणगांव नगरपंचायतीच्या सर्व वाहनांची देखभाल व दुरुस्ती करणे | दि. १६/९/२०२६ ते दि.२२/०९/२०२६ | ५०००/- | ५००/- |
| १६ | माणगांव नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांवरील खड्डे बुजविणे. | दि. १६/९/२०२६ ते दि.२२/०९/२०२६ | ५०००/- | ५००/- |
| १७ | विभागातील पाणीपुरवठा करणाऱ्या वाहिन्या वरील स्लुस वॉल मधील चेक नट व स्पिंडल दुरुस्ती करणे/नविन तयार करणे. | दि. १६/९/२०२६ ते दि.२२/०९/२०२६ | ५०००/- | ५००/- |
| १८ | माणगांव नगरपंचायत हद्दीतील रस्त्यावरील अतिक्रमणे हटविणे कामी आवश्यक मनुष्यबळ व यंत्रसामुग्री उपलब्ध करुन देणे. | दि. १६/९/२०२६ ते दि.२२/०९/२०२६ | ५०००/- | ५००/- |
| १९ | माणगांव नगरपंचायतीस लोखंडी रॅक, कपाट खरेदी करणे. | दि. १६/९/२०२६ ते दि. २२/०९/२०२६ | ५०००/- | ५००/- |
| २० | माणगाव नगरपंचायती करिता गार्डन साहित्य पुरविणे कामी दरपत्रक मागविणे. | दि. १६/९/२०२६ ते दि. २२/०९/२०२६ | - | - |
| २१ | माणगाव नगरपंचायत हद्दीतील नाट्यगृह बांधकाम करणे या कामी आवश्यक साहित्य पुरविणे कमी दरपत्रक मागविणे. | दि.१६/९/२०२६ ते दि. २२/०९/२०२६ | - | - |

**कामाच्या अटी व शर्ती**

वरील निविदा सुचना प्रसिद्धी, आवश्यक असणारी कागदपत्रे, शुद्धीपत्र इत्यादी माहिती माणगांव नगरपंचायत कार्यालयात उपलब्ध होईल.

### जाहीर निविदा / ई-निविदा सुचना

मुख्याधिकारी, माणगांव नगरपंचायत, हे निम्ननिर्देशित खालील कामांकरीता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत, अनुभवी व इच्छुक ठेकेदारांकडून ई. निविदा पद्धतीने निविदा मागविणेंत येत आहे.

| अ. क्र | कामाचे नांव | कालावधी | कामाची रक्कम | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. १५ मध्ये मालोरे यांच्या घरापासून ते बंदरकर अपार्टमेंट पर्यंत गटार बांधकाम करणे | दि. १६/०९/२०२६ ते दि.२९/०९/२०२६ | १०,००,०००/- | १०,०००/- | ५००/- |
| २ | माणगांव नगरपंचायत हद्दीतील मोर्बा रोड कॉर्नर येथील ट्रान्सफॉर्मर स्थलांतर करणे. | दि. १६/०९/२०२६ ते दि. २९/०९/२०२६ | ४,३०,२६०/- | ४,३०३/- | ५००/- |
| ३ | माणगांव नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र.१५ येथील विद्युत पोल स्थलांतर करणे. | दि. १६/०९/२०२६ ते दि. २९/०९/२०२६ | १,३३,२३३/- | १,३३२/- | ५००/- |
| ४ | प्रभाग क्र. १२ बामणोली रोड येथे पेव्हर ब्लॉक बसविणे | दि.१६/०९/२०२६ ते दि. २९/०९/२०२६ | २,००,०००/- | २,०००/- | ५००/- |
| ५ | प्रभाग क्र. १७ जुने माणगांव येथे १० HP पंप बसविणे व अनुषंगिक कामे करणे. | दि. १६/०९/२०२६ ते दि. २९/०९/२०२६ | १,३७,४००/- | १,३७४/- | ५००/- |

**कामाच्या अटी व शर्ती**

वरील संपूर्ण प्रक्रिया ई-निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर ई-निविदा सुचना प्रसिद्धी, असणारी कागदपत्रे, शुद्धीपत्र इत्यादी माहिती https://www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

सही/-
**मुख्याधिकारी**
**माणगांव नगरपंचायत**



# कृषीवल गणेश दर्शन स्पर्धा २०२६



● मुरूड-मजगाव येथील सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर फत्तेभाई यांच्या निवासस्थानी स्थानापन्न झालेली गणरायाची आकर्षक मंगलमूर्ती. (छायाचित्र : राजीव नेवासेकर)



● अर्जुन यशवंत कुंटे, कुंठ्याची गोठी, बामणगाव, अलिबाग



● पेझारी येथील सौ. रश्मी अपूर्व पाटील यांनी गणरायासाठी साकारलेली पुणेरी वाड्याची प्रतिकृती



● सुनील राजाराम भुरे, मु. तळवली, ता. अलिबाग



● मुरूड तालुका पंचायत समितीच्या माजी सभापती सौ. स्मिता रविंद्र खेडेकर यांच्या निवासस्थानी स्थानापन्न झालेली गणरायाची मंगलमूर्ती. (छायाचित्र - राजीव नेवासेकर)



● श्री. मंगेश निळकंठ भगत शहाबाज यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पा फोटो. (छायाचित्र : जीवन पाटील, भाकरवड)



● श्री गजानन दांडेकर खंडेराव पाडा गुरूजी यांचे निवासी गणेशाची सजावट. (छायाचित्र - सुरेश खडपे)



● सौ. मितल राजेंद्र नाईक, रेवदंडा यांचे निवासी केलेली नयनरम्य सजावट. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● श्री. शरद वरसोलकर, रेवदंडा यांचेकडील श्रींची मनमोहक मूर्ती. (छायाचित्र - सुरेश खडपे)



● श्री. सनित वार्डे, बुरूमखाण यांचे इथली गणेशाची मनमोहक सजावट. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● सौ. सुरेखा शैलेश घरत विद्यानगर अलिबाग यांचे निवासी गणरायाची मनमोहक सजावट. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● ज्येष्ठ साहित्यिक आणि आपत्ती सुरक्षा मित्र जयपाल पाटील श्री गणेशाचे दर्शन घेत असतानाचे छायाचित्र. (छायाचित्र : सुरेश खडपे)



● श्री. सागर रविंद्रन, (शास्त्रीनगर नागाव) यांचे इथली गणरायाची मनमोहक सजावट. (छायाचित्र : सुरेश खडपे)




● श्री. संजय नागवेकर आणि कुटुंबीय प्रियांका बिल्डींग, अलिबाग (छायाचित्र : सुरेश खडपे)



● श्री. शिवराम हंसराज पटेल चौल यांचेकडील श्री गणेशाची आकर्षक सजावट. (छायाचित्र : सुरेश खडपे)

## पनवेलमध्ये दीड दिवसांच्या बाप्पाला भावपूर्ण निरोप

**| खांदा | वार्ताहर |**

दीड दिवसांच्या गणरायाला मंगळवारी भक्तिभावाने भावपूर्ण निरोप देण्यात आला. 'गणपती बाप्पा मोरया', 'पुढच्या वर्षी लवकर या' च्या जयघोषाने पनवेल शहर दुमदुमून गेले. गणेशोत्सवाच्या सुरुवातीपासून घराघरात आनंदाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

मात्र, दीड दिवसांचा मुक्काम संपल्यानंतर बाप्पाला निरोप देताना गणेशभक्तांच्या डोळ्यांत भावूकपणा दिसून आला. पनवेलमधील बल्लाळेश्वर श्री गणेश घाटावर सकाळपासूनच घरगुती गणपतींच्या विसर्जनासाठी भक्तांची गर्दी झाली होती. ढोल-ताशांचा गजर, फुलांची उधळण आणि गणपती बाप्पाच्या जयघोषात मिरवणुका घाटावर दाखल होत होत्या. कुटुंबातील लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वजण बाप्पाला निरोप देण्यासाठी मोठ्या श्रद्धेने सहभागी झाले होते. विसर्जनापूर्वी अनेक भक्तांनी आपल्या लाडक्या गणरायाची मनोभावे पूजा केली. काहींनी बाप्पाला नैवेद्य दाखवून आरती केली, तर काहींनी कुटुंबासह त्यांचे औक्षण केले. यावेळी अनेक भक्त बाप्पाच्या मूर्तीसमोर काही क्षण शांत उभे राहिल्याचे पाहायला मिळाले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)